दैनिक
www.epaper.rajyaloktantra.com
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
• छत्रपती संभाजीनगर • पुणे • अहिल्यानगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–३१५ | शुक्रवार दि.१३ मार्च २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### 'जीवनाचा हक्क की सन्मानाने मृत्यूचा?'

भारतीय न्यायव्यवस्थेच्या इतिहासात कधी कधी असे काही निर्णय दिले जातात की ते केवळ एका प्रकरणापुरते मर्यादित राहत नाहीत, तर समाजाच्या नैतिक, कायदेशीर आणि मानवी मूल्यांवर दीर्घकालीन परिणाम घडवतात. हरियाणातील ३३ वर्षीय हरीश राणा या युवकाला पॅसिव्ह पद्धतीने इच्छामरण देण्यास सर्वोच्च न्यायालयाने दिलेली परवानगी हा तसाच एक ऐतिहासिक आणि संवेदनशील निर्णय ठरला आहे. भारतात पहिल्यांदाच सर्वोच्च न्यायालयाने अशा प्रकारे प्रत्यक्षात इच्छामरणाला परवानगी दिल्यामुळे हा निकाल न्यायव्यवस्था, वैद्यकीय क्षेत्र आणि समाजासाठी एक महत्त्वाचा टप्पा मानावा लागेल.

# महिला शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी विशेष विधेयक आणणार

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची घोषणा

मुंबई । प्रतिनिधी

**महाराष्ट्रातील महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी राज्य सरकार आगामी अधिवेशनात विशेष विधेयक सादर करणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिली. महिला शेतकऱ्यांच्या हक्कांचे संरक्षण, सातबाऱ्यावर नाव नसल्यामुळे निर्माण होणाऱ्या अडचणी दूर करणे आणि तंत्रज्ञानाचा वापर वाढवणे यावर सरकार भर देणार आहे. केंद्राच्या धर्तीवर राज्यात 'जेंडर रिसोर्स सेंटर' स्थापन करण्याचाही विचार करण्यात येत आहे. विधानभवनात महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणावर आयोजित चर्चासत्रात त्यांनी ही माहिती दिली.**



यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार म्हणाल्या की, महिला शेतकऱ्यांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी नवीन कायदा आणण्याचा सरकारचा विचार आहे. सातबाऱ्यावर नाव नसल्यामुळे महिलांना येणाऱ्या अडचणी दूर करणे तसेच शेतीच्या आकडेवारीत स्त्री–पुरुष शेतकऱ्यांची स्वतंत्र नोंद ठेवणे यासारख्या बाबी या कायद्यात समाविष्ट केल्या जातील. 'नमो ड्रोन दीदी' योजनेद्वारे महिलांना ड्रोन पायलटचे प्रशिक्षण दिले जाईल, तसेच शेतीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता वापरण्यासाठी प्रोत्साहन दिले जाईल. कृषी विभागाच्या योजनांमध्ये किमान ३० टक्के लाभ महिलांसाठी राखीव असून पीएम–किसान योजनेचा लाभ सुमारे १८ लाख महिलांना मिळत असल्याचे त्यांनी सांगितले. विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी ठोस धोरणांची गरज असल्याचे सांगितले. ग्रामीण भागातून शहरांकडे स्थलांतर वाढल्याने शेतीची जबाबदारी महिलांवर येत असून सुमारे ८० टक्के महिलांचे शेती क्षेत्रात योगदान असल्याचे त्यांनी नमूद केले. अनेक वेळा महिलांचे नाव सातबाऱ्यावर नसल्यामुळे त्यांना शासकीय योजनांचा लाभ घेण्यात अडचणी येतात, याकडेही त्यांनी लक्ष वेधले. ▶▶ पान २ वर

# गॅस टंचाईवरुन राहुल गांधींचा हल्लाबोल

## एपस्टिनचा उल्लेख, लोकसभेत प्रचंड गदारोळ

दिल्ली । वृत्तसंस्था

**देशातील गॅस टंचाईच्या मुद्यावरून गुरुवारी (दि. १२ मार्च) लोकसभेत प्रचंड गदारोळ झाला. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केंद्रीय तेलमंत्र्यांचे नाव घेताना एपस्टिन असा उल्लेख केल्याने गोंधळ उडाला. तेलासाठी भारताला अमेरिकेच्या परवानगीची काय गरज आहे? असा सवाल करत एलपीजी टंचाईवरून राहुल गांधींनी मोदी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. राहुल गांधी यांनी त्यांच्या बोलण्यात एपस्टिनचा उल्लेख केल्याने लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी त्याला तीव्र आक्षेप घेतला.**



"प्रत्येक देशाचा मजबूत पाया म्हणजे त्याची ऊर्जा सुरक्षा असते. आपण कोणाकडून तेल खरेदी करावे?, कोणाकडून गॅस खरेदी करावा? आपण रशियाकडून तेल खरेदी करू शकतो की नाही, हे ठरवण्याचा अधिकार अमेरिकेला असणे योग्य नाही. विविध तेल पुरवठादार देशांशी आपले संबंध कसे असावेत? हे आपणच ठरवले पाहिजे. भारतासारखा मोठा देश इतर कोणत्याही देशाला, दुसऱ्या देशाच्या राष्ट्राध्यक्षांना रशियाकडून आपल्याला तेल खरेदी करण्याची परवानगी का देईल?..." असा सवाल राहुल गांधी यांनी केला. त्यावर केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी लोकसभेत उत्तर दिले. "भारताला होत असलेला कच्च्या तेलाचा पुरवठा सुरक्षित आहे. या संकटापूर्वी, भारताच्या कच्च्या तेलाच्या आयातीपैकी ▶▶ पान २ वर

# मुंबईतील ४ ठिकाणांना बॉम्बने उडवण्याची धमकी

मुंबई । प्रतिनिधी

**राज्याचे महत्त्वपूर्ण अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असतानाच मुंबईत बॉम्बस्फोट करण्याची धमकी देणारा ई–मेल आला आहे. त्यामुळे प्रशासनाची मोठी धावपळ उडाली आहे. या धमकीमध्ये केवळ विधान भवनच नव्हे, तर बॉम्बे स्टॉक एक्स्चेंज, मुंबई उच्च न्यायालय, मेट्रो यांच्या नावाचाही समावेश आहे. या ठिकाणांना बॉम्बने उडवून देण्याचा उल्लेख करण्यात आला आहे. त्यामुळे सुरक्षा यंत्रणांनी संपूर्ण दक्षिण मुंबईत हाय अलर्ट जारी केला आहे.**

महाराष्ट्र विधिमंडळाला बॉम्बने उडवून देण्याचा धमकीचा ई–मेल आल्यानंतर गुरूवारी संपूर्ण दक्षिण मुंबईत तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. या धमकीच्या पार्श्वभूमीवर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी कडक पावले



उचलली आहेत. राहुल नार्वेकर यांनी दिवसभरासाठी अभ्यागतांना विधिमंडळात प्रवेश बंदी केली आहे. तसेच, सर्व प्रकारचे प्रवेश पास तात्पुरते रद्द करण्याचे आदेश देण्यात आले आहेत, अशी माहिती समोर आली आहे. विधिमंडळासोबतच ▶▶ पान २ वर

# ओबीसी 'क्रिमी लेयर'साठी वेतन एकमेव निकष असू शकत नाही–सर्वोच्च न्यायालय

दिल्ली । वृत्तसंस्था

ओबीसी आरक्षणातील क्रिमीलेयर ठरवण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाने एक महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. केवळ पालकांचे वेतन हा ओबीसी उमेदवारांना क्रिमीलेयरमध्ये समाविष्ट करण्याचा एकमेव निकष असू शकत नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

न्यायमूर्ती आर. महादेवन आणि न्यायमूर्ती पी.एस. नरसिंहा यांच्या खंडपीठाने केंद्र सरकारच्या कार्मिक व प्रशिक्षण विभागाच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकांवर हा निकाल दिला.



या निर्णयामुळे यूपीएसएसी उत्तीर्ण झालेल्या शेकडो ओबीसी उमेदवारांना मोठा दिलासा मिळाला आहे. केंद्र सरकारच्या कार्मिक ▶▶ पान २ वर

# शिवसेना पक्ष आणि चिन्ह कुणाचे? सुनावणी झाली पण फैसला नाही, पुन्हा पुढची तारीख

मुंबई । वृत्तसंस्था

**गेल्या तीन वर्षांपासून सुरू असलेल्या शिवसेना पक्ष आणि चिन्हाच्या निकालाला अद्याप मुहूर्त लागत नसल्याचे चित्र आहे. गुरूवारी या प्रकरणाची सुनावणी सर्वोच्च न्यायालयात पार पडली. त्यानंतर आता या याचिकेवर सुनावणी पुढच्या तारखेला होणार आहे. ती सुनावणी नेमक्या कोणत्या तारखेला होणार आहे हे मात्र अद्याप निश्चित नसून सर्वोच्च न्यायालयाकडून ते दोन्ही पक्षकारांना नंतर सांगण्यात येणार असल्याची माहिती आहे.**




शिवसेना पक्षाचं नाव आणि चिन्हासंदर्भात सर्वोच्च न्यायालयातील गुरुवारची सुनावणी संपली. या दरम्यान, शिवसेनेकडून ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल यांनी युक्तिवाद केला. शिवसेनेच्या दोन्ही गटांकडून म्हणजे ठाकरे आणि शिंदे गटाकडून अंतिम युक्तिवादाची तयारी दर्शवण्यात ▶▶ पान २ वर

# युद्ध लांबणार; अमेरिकन गुप्तचर यंत्रणेचा ट्रम्प यांना अहवाल, युद्धाचा खर्चही महाग

दिल्ली । वृत्तसंस्था

इराणवर हल्ला करून तेथील कट्टरतावादी सरकार हटवू असा दावा करणाऱ्या अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना आता स्वतःचं डोकं धरून बसण्याची वेळ येण्याची शक्यता आहे. त्याला कारणीभूत आहे तो म्हणजे अमेरिकन गुप्तचर संस्था सीआयएने दिलेला अहवाल. अमेरिकन गुप्तचर संस्थेच्या अहवालानुसार, खामेनींचा मृत्यू झाला असला तरीही इराणमधील सत्ताधारी नेतृत्व अजूनही स्थिर असून सरकार कोसळण्याची कोणतीही शक्यता दिसत नाही. त्यामुळे ट्रम्प यांनी केलेला दावा फोल ठरत असल्याची चर्चा सुरू झाली आहे.



अमेरिकन गुप्तचर यंत्रणांच्या अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे की, इराणमधील कट्टर नेतृत्व अजूनही सत्तेत मजबूत आहे. त्यामुळे युद्ध संपवण्याचा मार्ग सहज नाही, असेही या अहवालात नमूद करण्यात आलं आहे. दरम्यान, ▶▶ पान २ वर

# रोहित पवारांनी घेतली राहुल गांधींची भेट अजित पवारांच्या अपघाताबाबत केली चर्चा

दिल्ली । वृत्तसंस्था

**राष्ट्रवादीचे (शप) आमदार रोहित पवार यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी यांची दिल्लीत भेट घेत, दिवंगत अजित पवार यांच्या विमान अपघाताच्या चौकशीबाबत चर्चा केली आहे. हा मुद्दा संसदेच्या अधिवेशनात उचलून धरण्याची त्यांनी विनंती केली आहे. त्यांनी अपघाताच्या चौकशीसाठी इंडिया आघाडीच्या प्रमुख नेत्यांचीही भेट घेतली आहे. या अपघातामागे राजकीय षडयंत्र असण्याची शक्यता असून, तपास जाणीवपूर्वक संथ गतीने चालवला जात असल्याचा रोहित पवार यांनी आरोप केला आहे.**

रोहित पवार म्हणाले की, कोणत्याही



व्यक्तीला एफआयआर नोंदवण्याचा अधिकार आहे, मात्र अजित पवारांच्या अपघाताबाबत तसे करण्यास का अडथळे येत आहेत, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. तसेच, हा विषय सीबीआयकडे सोपवण्याचा प्रस्ताव अद्याप का स्वीकारला गेला नाही, यावरही त्यांनी बोट ठेवले. व्ही.के. सिंग आणि व्हीएसआर कंपनीला वाचवण्यासाठी सरकारकडून प्रयत्न केले जात आहेत. यामुळे या अपघातामागील राजकीय षडयंत्राचा ▶▶ पान २ वर

### टप्प्याटप्प्याने हा विषय घेणार

आता भारताला इंधनाची मोठी अडचण आलेली आहे. तो मुद्दा आम्ही I बैठकीत घेतला आहे. जर हाही मुद्दा त्या बैठकीत घेतला तर दोन्ही विषयांकडे लक्ष जाणार नाही. त्यामुळे आपल्याला टप्प्याटप्प्याने हा विषय घ्यावा लागेल. अजित पवार यांना न्याय देण्यासाठी काँग्रेस सुद्धा लढेल, असे राहुल गांधी यांनी सांगितले, अशी माहिती रोहित पवार यांनी दिली.

# आता स्वस्त धान्य दुकानांत एकाचवेळी तीन महिन्यांचे धान्य

## अमेरिका–इराण युद्धाच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाचा मोठा निर्णय

मुंबई । प्रतिनिधी

**अमेरिका आणि इराणच्या युद्धाचा परिणाम भारतात झाला आहे. या युद्धामुळे भारतात पुरवठा होणारा एलपीजी गॅसचा पुरवठा विस्कळीत झाला. आता भारतामध्ये थेट मोठे परिणाम बघायला मिळत आहेत. यादरम्यानच प्रशासनाकडून राज्यातील स्वस्त दुकानात तीन महिन्यांचे रेशन एकदाच देण्याचा मोठा निर्णय घेण्यात आला आहे.**

युद्धाचे परिणाम अधिक तीव्र होण्याची शक्यता असल्याने सरकार तीन महिन्यांचे धान्य रेशन दुकानांत पोहोचवणार आहे. राज्यभरातील ५१ हजारपेक्षा जास्त रेशन दुकानांत तीन महिन्यांचे धान्य उपलब्ध करून देणार आहे. स्वस्त धान्य दुकानांत एप्रिल, मे आणि जून महिन्याचा धान्यसाठा पोहोचवण्याच्या सूचना देण्यात आल्या. नागपूर जिल्ह्यातील १९०० स्वस्त धान्य दुकानांत तीन महिन्यांचा धान्यसाठा केला जाणार आहे. भविष्यात युद्धाचे परिणाम तीव्र होण्याच्या भीतीने तीन महिन्यांचे धान्य वितरण होणार आहे. नागपूर जिल्ह्यातील रेशन दुकानांमध्ये महिन्याला १६ हजार मेट्रिक टन धान्यसाठ्याची गरज आहे.



गहू आणि तांदळाचा तीन महिन्यांचा पुरवठा केला जाणार आहे. केंद्र सरकारच्या राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत राज्य सरकार तीन महिन्यांचे धान्य एकाच वेळी दुकानात पाठवणार आहे. युद्धामुळे डिझेलचा तुटवडा निर्माण झाल्यास धान्य वितरणात अडथळा येण्याची शक्यता आहे.नंदुरबार जिल्ह्यात घरगुती एलपीजी गॅसचा वाहनांमध्ये बेकायदेशीर वापर करणाऱ्या वाहनांवर आरटीओ विभागाने मोठी कारवाई केली आहे. विशेष तपासणी मोहिमेदरम्यान तब्बल ८०वाहने जप्त करण्यात आली असून या कारवाईमुळे गॅसच्या काळा बाजाराचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे. तपासणीदरम्यान अनेक वाहनांमध्ये घरगुती एलपीजी सिलिंडरचा वापर होत असल्याचे आढळून आले.संबंधित वाहनधारकांना तात्काळ सिलिंडर काढून घेण्याचे आदेश देण्यात आले असून, भविष्यात अशा प्रकारे घरगुती गॅसचा वापर करताना आढळल्यास कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. जिल्ह्यात घरगुती गॅसचा साठा मर्यादित असल्याने आणि वाहनांमध्ये ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### परभणी मनपाला जीएसटीचे थकीत ७३ कोटी मिळणार

परभणीः परभणी महापालिकेचे शासनाकडे थकीत असलेले जीएसटीचे ७३ कोटी ७१ लाख रुपयांच्या अनुदानाचा प्रस्ताव दोन दिवसात मंत्रिमंडळ बैठकीत ठेवून त्याला मंजुरी देणार असल्याची माहिती नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिली आहे. या संदर्भात आमदार डॉ. राहुल पाटील यांनी विधानसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात गुरुवार, दि.१२ रोजी लक्षवेधी उपस्थित करत जीएसटी थकीत अनुदान देण्याची मागणी केली होती. परभणी महापालिकेच्या शासनाकडे थकीत असलेल्या कोट्यवधीच्या जीएसटी अनुदानाचा मुद्दा आ. डॉ. पाटील यांनी सभागृहात गुरूवारी आक्रमकपणे लावून धरला. मनपाची स्थिती अत्यंत बिकट झालेली आहे. येथील आयुक्तांसह सर्व कर्मचाऱ्यांचे मागील ५ ते ६ महिन्यांचे वेतन थकीत आहे.

### काऊंटर तिकिट काढणाऱ्यांना आता विम्याचे कवच

नवी दिल्लीः ऑनलाइन तिकीट बुक करताना प्रवासी अतिशय कमी अतिरिक्त शुल्क देऊन प्रवास विमा घेऊ शकतात. मात्र सध्या काउंटरवरून तिकीट खरेदी करणाऱ्या प्रवाशांना हा पर्याय उपलब्ध नाही, हे योग्य नाही. रेल्वेच्या काउंटरवरून तिकीट घेणाऱ्या प्रवाशांना प्रवास विम्याचा लाभ नाकारता येणार नाही असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. रेल्वेचे काउंटर तिकिट घेतलेल्या प्रवाशांना विमा सुविधा उपलब्ध नाही हा मुद्दा न्यायाधीशांचे सल्लागार (न्यायालयाचे सल्लागार) वरिष्ठ वकील शिखिल सुरी यांनी न्यायमूर्ती हसनुद्दीन अमानुल्ला आणि आर. महादेवन यांच्या खंडपीठासमोर उपस्थित केला.

### देशावर संकट, सर्वपक्षीय बैठक बोलवा–सुप्रिया सुळें

दिल्ली : शेतीचा खर्च वाढला आहे. पॉलिहाऊसचे ४० टक्के अनुदान अजून मिळालेले नाहीत. यामुळे शेतीचे उत्पन्न दुपटीने कसे होईल? असा सवाल राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी गुरुवारी (दि. १२ मार्च) लोकसभेत केला. २०२५–२६ या वर्षासाठीच्या अनुदानाच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेवळी त्या बोलत होत्या. त्यांनी सध्याच्या गॅस टंचाई प्रश्नाकडेही सरकारचे लक्ष वेधून घेण्याचाही प्रयत्न केला. देशावर मोठे संकट येणार आहे. सर्वपक्षीय बैठक बोलावा, अशी मागणी त्यांनी केली. सरकारने अर्थसंकल्पात घोषणा केली होती की, ग्रीन अमोनिया खत आयात अमोनियाची जागा घेईल.

### तीन ३ कोटी बॅरल रशियन तेल भारतात

नवी दिल्लीः अमेरिका–इस्रायल आणि इराणमधील युद्धामुळे आखाती देशांतून होणारा कच्च्या तेलाचा पुरवठा विस्कळीत झाला आहे. या तणावामुळे अमेरिकेने गेल्या सप्ताहात रशियन तेल खरेदीस हिरवा कंदील दाखवला. त्यानंतर अवघ्या काही दिवसांतच तब्बल ३ कोटी बॅरल रशियन तेल भारतात दाखल झाले आहे. गतवर्षी अमेरिकेने भारतावर रशियन तेल खरेदीसाठी २५ टक्के दंडात्मक शुल्कवाढ केली होती. रशियन तेल खरेदीवरून सातत्याने राजनैतिक दबाव टाकण्यात येत होता. इराणवरील हल्ल्यांनंतर भारताची इंधन सुरक्षा धोक्यात आली आहे. अमेरिकेने गेल्या सप्ताहात रशियन तेल खरेदीसाठी काहीकाळ सवलत देऊ केली आहे. त्यानंतर इंडियन ऑईल कॉर्पोरेशन (आयओसी), रिलायन्ससह काही कंपन्यांनी विकल्या न गेलेल्या रशियन तेलाची खरेदी केली आहे.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड, दि.१२ मार्च २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहूः २७७.५० क्विंटल | १,९०० | २,६८३ | २,२१५ |
| ज्वारी/हायब्रिड : १४३.०० क्विंटल | २,१०० | ५,१५१ | ३,३७५ |
| मका/लोकलः ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : ३८.५० क्विंटल | ६,५०० | ७,६५१ | ७,३०५ |
| उडीद : २.५० क्विंटल | ६,३५४ | ६,३५४ | ६,३५४ |
| बाजरीः ३.५० क्विंटल | २,२०० | २,६२२ | २,४५५ |
| मुगः २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीनः १.५० क्विंटल | ५,१५० | ५,१५० | ५,१५० |
| हरभराः २४.०० क्विंटल | ४,९०० | ५,५०० | ५,०६२ |

## अग्रलेख

# ‘जीवनाचा हक्क की सन्मानाने मृत्यूचा?’

भारतीय न्यायव्यवस्थेच्या इतिहासात कधी कधी असे काही निर्णय दिले जातात की ते केवळ एका प्रकरणापुरते मर्यादित राहत नाहीत, तर समाजाच्या नैतिक, कायदेशीर आणि मानवी मूल्यांवर दीर्घकालीन परिणाम घडवतात. हरियाणातील ३३ वर्षीय हरीश राणा या युवकाला पॅसिव्ह पद्धतीने इच्छामरण देण्यास सर्वोच्च न्यायालयाने दिलेली परवानगी हा तसाच एक ऐतिहासिक आणि संवेदनशील निर्णय ठरला आहे. भारतात पहिल्यांदाच सर्वोच्च न्यायालयाने अशा प्रकारे प्रत्यक्षात इच्छामरणाला परवानगी दिल्यामुळे हा निकाल न्यायव्यवस्था, वैद्यकीय क्षेत्र आणि समाजासाठी एक महत्त्वाचा टप्पा मानावा लागेल.

इच्छामरण किंवा युथेनेशिया हा विषय जगभरात अनेक वर्षांपासून चर्चेचा विषय राहिला आहे. एका बाजूला मानवी जीवनाचे पावित्र्य आणि त्याचे संरक्षण करण्याची नैतिक जबाबदारी आहे, तर दुसऱ्या बाजूला असह्य वेदनांमध्ये अडकलेल्या रुग्णाला सन्मानाने मृत्यू स्वीकारण्याचा अधिकार असावा का, हा प्रश्न आहे. भारतीय संविधानाने जीवनाचा अधिकार दिला असला तरी जीवन म्हणजे केवळ श्वास चालू ठेवणे एवढेच नसून त्यामध्ये सन्मानाने जगण्याचाही अर्थ अभिप्रेत आहे. त्यामुळे जेव्हा एखादा रुग्ण पूर्णपणे असहाय्य अवस्थेत, कोणतीही सुधारणा होण्याची शक्यता नसताना वर्षानुवर्षे लाइफ सपोर्टवर जगत असतो, तेव्हा ''जगणे'' आणि ''जगवणे'' यातील सीमारेषा अत्यंत धूसर होते.

२०१८ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या महत्त्वपूर्ण निकालामध्ये ''मरण स्वीकारण्याचा हक्क'' हा मूलभूत अधिकाराचा भाग असल्याचे स्पष्ट केले होते. त्या वेळी न्यायालयाने पॅसिव्ह युथेनेशियाला म्हणजेच उपचार थांबवून नैसर्गिक मृत्यू स्वीकारण्यास काही अटींसह परवानगी दिली होती. तसेच या संदर्भात सरकारने मार्गदर्शक तत्त्वे तयार करावीत असेही निर्देश दिले होते. मात्र त्या निर्णयानंतर प्रत्यक्षात अशा प्रकारे इच्छामरणाला परवानगी देणारा निर्णय न्यायालयाने दिला नव्हता. त्यामुळे हरीश राणा प्रकरणातील निकाल हा त्या २०१८ च्या निर्णयाचा प्रत्यक्ष वापर मानला जात आहे.

हरीश राणा हा तरुण वयाच्या वीसाव्या वर्षी इमारतीवरून पडून गंभीर जखमी झाला आणि त्यानंतर तो ब्रेन डेड अवस्थेत गेला. गेल्या तेरा वर्षांपासून त्याचे आयुष्य केवळ वैद्यकीय उपकरणांवर टिकून होते. त्याच्या शरीराला नाक-तोंडातील नळ्यांद्वारे आहार दिला जात होता. पण या सर्व प्रयत्नांनंतरही त्याच्या प्रकृतीत कोणतीही सुधारणा होत नव्हती. मेडिकल बोर्डानेही स्पष्ट अहवाल दिला की पुढे उपचार करूनही कोणताही सकारात्मक परिणाम होण्याची शक्यता नाही. अशा परिस्थितीत त्याच्या वृद्ध आई-वडिलांनीच इच्छामरणाची मागणी केली. या सर्व बाबींचा विचार करून सर्वोच्च न्यायालयाने अत्यंत संवेदनशील आणि मानवी दृष्टिकोनातून हा निर्णय दिला. वैद्यकीय क्षेत्रासाठीही हा प्रश्न अत्यंत गुंतागुंतीचा आहे. डॉक्टरांचे पहिले कर्तव्य म्हणजे रुग्णाचा जीव वाचवणे. परंतु उपचारांचा कोणताही उपयोग होत नसताना केवळ उपकरणांच्या आधारावर रुग्णाचे जीवन टिकवून ठेवणे योग्य आहे का, हा प्रश्न डॉक्टरांनाही पडतो. अनेकदा अशा रुग्णांची अवस्था केवळ शारीरिकच नव्हे तर मानसिक आणि आर्थिकदृष्ट्याही कुटुंबासाठी असह्य बनते. त्यामुळे अशा परिस्थितीत सन्मानाने मृत्यू स्वीकारण्याचा पर्याय उपलब्ध असावा का, यावर जगभरात चर्चा होत असते. मात्र इच्छामरणाचा विषय जितका संवेदनशील आहे तितकाच तो धोकादायकही ठरू शकतो. कारण जर त्याला पूर्णपणे मुक्त परवानगी दिली गेली तर त्याचा गैरवापर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मालमत्ता, वारसा किंवा कौटुंबिक तणाव यांसारख्या कारणांमुळे एखाद्या रुग्णाला जबरदस्तीने इच्छामरणाकडे ढकलले जाऊ शकते. म्हणूनच भारतात सर्वोच्च न्यायालयाने हा विषय अत्यंत सावधपणे हाताळला आहे. न्यायालयाने स्पष्ट केले आहे की इच्छामरण हा पर्याय फक्त त्या वेळीच विचारात घेतला जाईल जेव्हा रुग्णाच्या प्रकृतीत सुधारणा होण्याची कोणतीही शक्यता उरलेली नसेल आणि त्याबाबत वैद्यकीय तज्ज्ञांचा स्पष्ट अहवाल असेल.

या निर्णयातून न्यायालयाने एक महत्त्वाचा संदेश दिला आहे. तो म्हणजे जीवनाचा सन्मान राखणे हे जितके आवश्यक आहे तितकेच मृत्यूचाही सन्मान राखणे महत्त्वाचे आहे. मानवी जीवनाला केवळ वैद्यकीय उपकरणांच्या आधारावर टिकवून ठेवणे हा नेहमीच मानवतेचा विजय ठरत नाही. काही वेळा शांत आणि सन्मानपूर्वक मृत्यू स्वीकारणे हीच त्या व्यक्तीसाठी खरी मुक्ती असू शकते. हरीश राणा प्रकरणामुळे आता देशात इच्छामरणाबाबत अधिक व्यापक चर्चा होण्याची शक्यता आहे. केंद्र सरकारने यासंदर्भात स्पष्ट आणि काटेकोर मार्गदर्शक तत्त्वे तयार करणे आवश्यक आहे. रुग्णाचे हित, कुटुंबाची संमती, वैद्यकीय तज्ज्ञांचा अहवाल आणि न्यायालयीन देखरेख या सर्व बाबींचा विचार करून एक सुस्पष्ट कायदेशीर चौकट उभी करणे ही काळाची गरज आहे.मानवी जीवनाचे मूल्य अमूल्य आहे, याबद्दल कोणाचेही मतभेद नाहीत. परंतु जीवनाचा अर्थ केवळ श्वास चालू ठेवण्यात नसून त्यामध्ये सन्मान, स्वातंत्र्य आणि मानवी प्रतिष्ठा यांचाही समावेश आहे. त्यामुळे जीवन आणि मृत्यू यांच्या सीमेवर उभ्या असलेल्या अशा प्रकरणांकडे केवळ कायद्याच्या चौकटीतून नव्हे तर मानवी संवेदनशीलतेच्या दृष्टीने पाहणे आवश्यक आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेला हा निर्णय त्या दिशेने टाकलेले एक महत्त्वाचे आणि धाडसी पाऊल मानावे लागेल.

## प्रत्येक क्रांतीच्या माघे आईच असते-महंत राधाताई महाराज सानप आईसाहेब

# आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे कार्य कौतुकास्पद-प्राजक्ताताई धस

आष्टी । प्रतिनिधी

**''प्रत्येक क्रांतीच्या माघे आईच असते. जन्मापासून प्रत्येक यशोगाथेमागे आईचे योगदान महत्त्वाचे असते. आईनेच मुलींना चांगले संस्कार द्यायला हवेत. सध्याच्या काळात शिक्षणामुळे अनेक महिला विविध क्षेत्रात उच्च पदांवर कार्यरत आहेत, ही अभिमानाची बाब आहे. मात्र, तरीही तळागाळातील महिला अजूनही प्रगतीपासून दूर आहेत. त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे,'' असे प्रतिपादन महंत राधाताई महाराज सानप (आईसाहेब) यांनी केले.**





आष्टी येथील पंचायत समिती सभागृहात आष्टी तालुका युवा पत्रकार संघाने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय नारी सन्मान पुरस्कार वितरण सोहळ्यात त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून महानंद मुंबईच्या संचालिका प्राजक्ताताई धस यांनी सांगितले की, ''आष्टी तालुका युवा पत्रकार संघ नेहमीच सामाजिक कार्यात आघाडीवर असतो. गेल्या ७ वर्षांपासून सातत्य राखत जागतिक महिला दिनानिमित्त कर्तबगार महिलांना पुरस्कार देऊन गौरविण्याचे कार्य ते करीत आहेत. यामुळे महिलांना प्रेरणा मिळत आहे. युवा पत्रकार संघाचे हे कार्य अत्यंत कौतुकास्पद आहे.''

यावेळी आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्यावतीने जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने राज्यस्तरीय नारी सन्मान २०२६ पुरस्कारांचे वितरण गुरूवार दि १२ मार्च रोजी करण्यात आले. यामध्ये विविध क्षेत्रातील ४३ कर्तबगार महिलांचा समावेश होता. पुढे बोलताना अध्यक्ष प्राजक्ताताई धस म्हणाल्या, ''आज महिला कोणत्याही क्षेत्रात मागे नाहीत. त्या पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून सर्व क्षेत्रात कार्यरत आहेत. आपल्या कार्याचा ठसा उमटवीत त्या पुढे जात आहेत, याचा मला सार्थ अभिमान आहे. प्रत्येक स्त्रीने आपली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडावी,'' असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमास गटविकास अधिकारी गोकुळ बागलाणे, एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी ज्योती बेल्हेकर, गटशिक्षणाधिकारी मोहन काकडे, वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रियंका सिंघण, सहाय्यक अभियंता कोमल शिंदे, सरपंच वंदनाताई गायकवाड, शालिनीताई मुळे, प्रतिभाताई थोरवे, जिजाऊ ब्रिगेडच्या शहराध्यक्षा विद्याताई चव्हाण, आशा कारंडे, वर्षाताई शिंदे, डॉ.सविता जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक बाळासाहेब तळेकर यांनी केले. प्रास्ताविक अध्यक्ष अविनाश कदम व पत्रकार समीर शेख यांनी तर आभार सचिव गहिनीनाथ पाचबैल यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अध्यक्ष अविनाश कदम, सचिव गहिनीनाथ पाचबैल, उपाध्यक्ष जावेद पठाण,ज्येष्ठ पत्रकार निसार शेख, संतोष दाणी, पत्रकार समीर शेख,संतोष नागरगोजे, राजेंद्र लाड,अक्षय विधाते,सोपान पगारे, प्रेम पवळ,संस्कार लाड, विठ्ठल राख, सचिन पवार, किरण शिनगिरे,ओंकार कदम, सुरज शिंदे, दिपक उंबरकर,अर्थव डाडर यांनी परिश्रम घेतले.

## महात्मा फुलेंचे शेतकऱ्याचा आसुड,गुलामगिरीहे ग्रंथ पुन्हा पुन्हा वाचा-ह.भ.प.नितीन महाराज पिसाळ

बीड । प्रतिनिधी

निरगुडी ता.पाटोदा येथे जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने आयोजित प्रबोधनपर किर्तनासाठी जगदगुरु संत तुकाराम महाराज यांच्या ''विष्णुमय जग,वैष्णवांचा धर्म ,भेदाभेद भ्रम,अमंगळ!'' या अभंगाचे निरूपण करताना, भेदाभेदरहित- सामाजिक सलोखा,बंधूभाव,समता,

स्वातंत्र्य ही मुल्ये अधोरेखित करताना वारकरी संप्रदाय व या परंपरेत पुढे विशेषत: शेतकरी वर्गाने रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज,महात्मा ज्योतिबा फुले,डॉ बाबासाहेब आंबेडकर,राजर्षी शाहू महाराज यांचे विचार,त्यानुषंगाने जीवनभर अथक केलेले कार्य,लक्षात घेण्यासाठी त्यांचे साहित्य पुन्हा पुन्हा वाचावे. एक वेळ भजन किर्तन ऐकले नाही तरी चालेल ;परंतु महात्मा फुले यांचे शेतक-यांचा आसुड गुलामगिरी,डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे जातींचे निर्मूलन,शूद्र कोण होते?, स्त्रीवादी आंबेडकरवाद कॉ. गोविंद पानसरे यांचे शिवाजी कोण होता? प्रबोधनकार ठाकरे यांचे लोकहितवादी दीनोद्धारक कर्मयोगी संत गाडगे बाबा संत कबीर,हे व असे सामाजिक एकता,एकात्मता, न्याय ,धार्मिक सद्भावना,सहिष्णुता असे अत्यावश्यक मुल्ये ऐतिहासिक पुराव्यासहीत मांडणारे ग्रंथ वाचायलाच हवेत.असे स्पष्ट प्रतिपादन प्रबोधनकार किर्तनकार ह.भ.प.नितीन महाराज पिसाळ यांनी केले. महाराजांना मृदंगाचार्य प्रवीण महाराज,प्रभावी सुरेल गायक दादा महाराज, गणेश बेदरे महाराज,शेलार महाराज व सहकारी ग्रामस्थांनी मोलाची साथ दिली. या प्रसंगी अंगणवाडी सेविका विजया सुतार,वैशाली बेदरे,आशा वर्कर चंद्रकला सानप, मदतनिस अनिता कदम,से. नि. मु. अ. वृंदा सुस्कर,व सविता बेदरे यांना पुस्तके,शाल ,बुके देवून नितीन महाराजांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमास अर्चना दोडके,दिपाली सानप,शोभा बेदरे,मनिषा घुमरे,सुनंदा घुमरे,उषा सुस्कर,संगीता तावरे, प्रगती बेद्रे, सोजरबाई सवासे, अनुसया तांदळे,ज्योती सवासे,सावंत काकू,पार्वती बेदरे या प्रमुख महिलांसह शेकडोंची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे आयोजन प्रशासक सरपंच अशोक सानप,से नि अधिकारी राहूल शिंदे, बळीराम सानप, भाऊसाहेब शिंदे,शेख अख्तर,से नि प्रा विठ्ठल सवासे, शिवशंकर घुमरे,अर्जून शेलार,संतोष शेलार लेक लाडकी अभियानचे समन्वयक बाजीराव ढाकणे यांनी यशस्वीरित्या केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राहूल शिंदे,संचलन सरपंच अशोक सानप यांनी व सर्वांचे आभार डी. जी. तांदळे यानी मानले.

# अंभोरा ग्रामपंचायतीला मानांकन; लोकसहभागातून विकासाची नवी दिशा

आष्टी । शरद रेडेकर

बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील अंभोरा ग्रामपंचायतीने विविध लोकाभिमुख उपक्रम राबवत ग्रामविकासाचा आदर्श निर्माण केला असून या कार्याची दखल घेत ग्रामपंचायतीला नुकतेच मानांकन प्राप्त झाले आहे. त्यामुळे अंभोरा गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून गाव आदर्श ग्रामपंचायतीच्या दिशेने वाटचाल करत आहे.

अंभोरा ग्रामपंचायत नागरिकाभिमुख कारभारामुळे विशेष चर्चेत असून गावातील नागरिकांना अनेक सुविधा मोफत उपलब्ध करून दिल्या जात आहेत. ग्रामस्थांना शुद्ध पिण्याचे पाणी मोफत देण्याबरोबरच ग्रामपंचायतीच्या स्वमालकीच्या पीठ गिरणीतून करभरणा करणाऱ्या नागरिकांना वर्षभर ज्वारी, बाजरी, गहू यांसारख्या धान्याचे मोफत दळण करून दिले जाते. तसेच तेल काढणी यंत्र, मिरची कांडप यंत्र आणि कडबा कुट्टी यंत्राद्वारेही ग्रामस्थांना मोफत सेवा दिली जाते. महिलांसाठी ग्रामपंचायत संचलित सखी प्रेरणा भवन सुरू करण्यात आले असून येथे सॅनिटरी पॅड वेंडिंग मशीन व स्मार्ट बर्नरची सुविधा उपलब्ध आहे. स्वयंसहाय्यता बचत गटांना उत्पादन वाढीसाठी बंदिस्त जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. नव्याने उभारण्यात आलेले डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम ज्ञानमंदिर गावकऱ्यांच्या सेवेत दाखल झाले असून ग्रंथालय, वाचनालय व अभ्यासिका अशा सुविधा मोफत उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची सवय लागावी यासाठी ग्रामपंचायतीने दररोज सायंकाळी ६ वाजता अभ्यास सायरन सुरू केला आहे. सायरन वाजल्यानंतर विद्यार्थी रात्री ८ वाजेपर्यंत अभ्यास करतात, त्यामुळे विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा उंचावत आहे. ग्रामपंचायतीमार्फत ३५० करदात्यांना फवारणी पंपांचे वाटप करण्यात आले असून आयुष्मान भारत कार्ड काढण्यासाठी नागरिकांना मदत केली जाते. गावातील शालेय विद्यार्थ्यांना मोफत स्पोर्ट शूज देण्यात आले असून जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेसाठी वित्त आयोग निधीतून प्रशस्त स्वच्छतागृह उभारण्यात आले आहे. शाळेच्या नवीन इमारतीचे कामही प्रगतीपथावर आहे. पर्यावरण संवर्धनासाठी मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्यात आली असून नागरिकांनाही वृक्षरोपे देण्यात आली आहेत. वृक्षांचे उत्तम जतन करणाऱ्यास ३००१ रुपयांचे बक्षीस देण्याची योजना राबविण्यात येत आहे. महिलांसाठी नियमित ॲनिमिया तपासणी शिबिर, नागरिकांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिरे तसेच ग्रामदरबार उपक्रम राबवून शासनाच्या योजना गावातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला जात आहे. महिलांसाठी उद्योजकता व कौशल्य विकास प्रशिक्षण तसेच निरक्षर महिलांसाठी साक्षरता वर्गांचे आयोजन करण्यात येते. गावातील रस्त्यांचे काँक्रिटीकरण, पाणलोट विकास कामे, शेततळी, सार्वजनिक ठिकाणांचे सुशोभीकरण अशा विविध कामांमुळे गावाचा विकास वेगाने होत आहे. नागरिकांच्या तक्रारींसाठी ग्रामपंचायत कार्यालयात तक्रारपेटी ठेवण्यात आली असून ग्रामपंचायतच्या वेबसाईटवरून घरबसल्या अर्ज व तक्रारी दाखल करण्याची सुविधा उपलब्ध आहे. या सर्व उपक्रमांमुळे अंभोरा ग्रामपंचायत सुशासनाचा आदर्श नमुना ठरत असून मानांकनामुळे गावाच्या विकासकार्याला अधिक बळ मिळाले आहे.

''अंभोरा गावच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही नेहमी कटिबद्ध आहोत. नागरिकांना सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करून देणे हे आमचे कर्तव्य आहे.'' सागर आमले, लोकनियुक्त सरपंच, अंभोरा ''गावातील शेवटच्या वंचित घटकाला केंद्रस्थानी ठेवून लोकसहभागातून ग्रामविकास साध्य करण्याचा आमचा प्रयत्न आहे.'' दिपक नरवडे, ग्रामविकास अधिकारी, अंभोरा.

## पान १ वरून...

**महिला शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी**

यावेळी महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, शेती क्षेत्रातील महिलांना नवतंत्रज्ञानाचे पाठबळ देण्यासाठी कृषी आणि महिला व बालविकास विभाग एकत्रितपणे काम करत आहेत. गेल्या वर्षी अहिल्यानगर येथे १५ हजार महिलांना शेतीसाठी आवश्यक उपकरणे देण्यात आली होती. याच धर्तीवर राज्यभर असे उपक्रम राबविण्याचा विचार आहे.

------------

**मुंबईतील ४ ठिकाणांना**

आशियातील सर्वांत मोठा शेअर बाजार असलेल्या बॉम्बे स्टॉक एक्स्चेंजलाही बॉम्बने उडवून देण्याची धमकी मिळाली होती. ही धमकी मिळाल्यानंतर आता मुंबई पोलिसांनी तातडीने बीएसई इमारतीत शोधकार्य सुरू केले आहे. सध्या राज्य राखीव पोलिस बल, बॉम्बशोधक व नाशक पथक आणि श्वान पथक घटनास्थळी दाखल झाले आहे. या पथकाकडून संपूर्ण परिसराची कसून तपासणी केली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पोलिसांनी बीएसईच्या आत दोन विशेष पथके तैनात केली आहेत. यासोबतच प्रत्येक मजल्याची झाडाझडती घेतली जात आहे. इमारतीच्या बाहेरही मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. या प्राथमिक तपासात अद्याप कोणतीही संशयास्पद वस्तू सापडलेली नाही, मात्र खबरदारीचा उपाय म्हणून यंत्रणा हाय अलर्टवर आहेत. हा धमकीचा ई-मेल कोणी आणि कुठून पाठवला, याचा तपास आता सायबर सेल आणि गुन्हे शाखेकडून केला जात आहे. विधिमंडळाचे कामकाज सुरू असतानाच ही धमकी आल्याने सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत गंभीर पावले उचलली जात आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, गुरूवारी पहाटे ६ वाजून ५७ मिनिटांनी ‘सीपीए’च्या अधिकृत ईमेल आयडीवर हा धमकीचा संदेश प्राप्त झाला. यामध्ये इराण, इस्रायल आणि अमेरिकेतील संघर्षाचा संदर्भ देत खलिस्तानी आंदोलकांशी संबंधित असल्याचे संकेत देण्यात आले आहेत. प्राथमिक माहितीनुसार हा ई-मेल खोटा असण्याची शक्यता आहे, तरीही सुरक्षेच्या दृष्टीने कोणतीही तडजोड केली जाणार नाही.

--------

**गॅस टंचाईवरुन राहुल**

सुमारे ४५ टक्के तेलाची आयात ही होर्मुझच्या सामुद्रधुनी मार्गातून होत असे. पंतप्रधान मोदींच्या उत्कृष्ट राजनैतिक प्रयत्नांमुळे भारताने कच्च्या तेलाचा पुरवठा निश्चित केला आहे. होर्मुझ सामुद्रधुनीतून त्या कालावधीत जितका पुरवठा झाला असता त्यापेक्षाही तो अधिक आहे.'' असा दावा मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी केला. देशात पेट्रोल, डिझेल, केरोसीन, एटीएफ अथवा इंधन तेलाची टंचाई नाही. पेट्रोल, डिझेल, विमान वाहतूक, टर्बाइन इंधन आणि इंधन तेलाची उपलब्धता पूर्णपणे सुनिश्चित असल्याचे त्यांनी सांगितले. ही अफवा अथवा खोटे नॅरेटिव्ह पसरवण्याची वेळ नाही. भारताला इतिहासातील सर्वात गंभीर स्वरुपाच्या जागतिक ऊर्जा अडथळ्याला सामोरे जाव लागत आहे. फळांचा पुरवठा सुरळीत आहे. घरगुती आणि शेतीसाठी गॅस पुरवठ्याला प्राधान्य दिले जात आहे. एलपीजीचे उत्पादन २८ टक्क्यांनी वाढवले आहे. भारताने अशा परिस्थितीत संकटाचे व्यवस्थापन करणाऱ्यांच्या मागे ठामपणे उभे राहिले राहिजे आणि देशाच्या हिताच्यादृष्टीने एकजूट दाखवली पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

------------

**शिवसेना पक्ष आणि चिन्ह कुणाचे?**

आली आहे. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने आता त्यावर पुढच्या तारखेला सुनावणी होईल असे स्पष्ट केले आहे. शिवसेनेच्या अंतिम युक्तिवादासाठी पुढची तारीख ही उपलब्धतेनुसार देण्यात येईल असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. दोन्ही बाजूंचा लेखी युक्तिवाद वाचून पुढील तारीख निश्चित करणार असल्याचं सर्वोच्च न्यायालयाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. शिवसेना पक्ष आणि या पक्षाचं निवडणूक चिन्ह असलेला धनुष्यबाण कोणाचा, या मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. २०२२ साली एकसंध शिवसेनेतून फुटलेल्या एकनाथ यांचा पक्ष हाच खरा शिवसेना पक्ष असल्याच्या आणि त्यांना धनुष्यबाण हे चिन्ह वापरण्यास मुभा देणाऱ्या केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्णयाला उद्धव ठाकरे यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे.

-----------

**ओबीसी ‘क्रिमी लेयर’साठी वेतन एकमेव**

व प्रशिक्षण विभागाने काही उमेदवारांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न ८ लाख रुपयांपेक्षा जास्त असल्याचे कारण देत त्यांना सरसकट क्रिमीलेयरमध्ये टाकले होते. यामुळे या उमेदवारांना ओबीसी आरक्षणाचा लाभ नाकारण्यात आला होता. याविरुद्ध उमेदवारांनी केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरण (कॅट) आणि उच्च न्यायालयात दाद मागितली होती. तिथे उमेदवारांच्या बाजूने निकाल लागल्यानंतर केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. खंडपीठाने स्पष्ट केले की, ८ सप्टेंबर १९९३ च्या कार्यालयीन ज्ञापनानुसार क्रिमीलेयर ठरवण्याचे निकष स्पष्ट आहेत. उत्पन्न आणि संपत्तीची गणना करताना वेतन आणि शेतीपासून मिळणारे उत्पन्न एकत्र करून विचारात घेता येत नाही. केवळ उत्पन्नाच्या आकड्यांवर आधारित यांत्रिक पद्धतीने क्रिमीलेयर ठरवणे हे आरक्षण धोरणाच्या मूळ उद्देशाला बाधक ठरू शकते, असे नमूद केले. न्यायालयाने आपल्या निरीक्षणात नमूद केले की, सरकारी कर्मचारी आणि सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांतील कर्मचाऱ्यांच्या मुलांसाठी वेगवेगळे निकष लावणे हे संविधानाच्या कलम १४ (समानतेचा अधिकार) चे उल्लंघन आहे. समान सामाजिक आणि आर्थिक स्थितीत असलेल्या उमेदवारांशी सरकार वेगळा व्यवहार करू शकत नाही. क्रिमीलेयरची संकल्पना ही केवळ आर्थिक नसून ती सामाजिकदृष्ट्या प्रगत घटकांना आरक्षणातून वगळण्यासाठी आहे. त्यामुळे पालकांचे पद, त्यांची सामाजिक स्थिती आणि इतर घटकांचा विचार करणे अनिवार्य आहे.

------------

**रोहित पवारांनी घेतली राहुल गांधींची भेट**

संशय अधिक वाढत चालला आहे. जरी अजित पवारांचे कुटुंबीय सध्या सरकारमध्ये असले, तरी एक मराठी माणूस म्हणून अन्यायाविरुद्ध लढणे हे त्यांचे कर्तव्य असल्याचे म्हटले. राहुल गांधी यांच्या संशोधन टीमनेही या विषयावर प्राथमिक अभ्यास केला असून, रोहित पवारांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली अधिकची माहिती त्यांना सुपूर्द केली आहे. विमान वाहतूक मंत्रालय आणि सीबीआय हे केंद्र सरकारच्या अखत्यारीत येत असल्याने हा मुद्दा लोकसभेत आणि राज्यसभेत येणे अत्यंत गरजेचे आहे. राज्याच्या अधिवेशनातही हे प्रश्न उपस्थित केले होते, मात्र त्यावर चर्चा टाळली जात असल्याचे त्यांनी सांगितले.

------------

**युद्ध लांबणार; अमेरिकन गुप्तचर यंत्रणेचा**

२८ फेब्रुवारी रोजी इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला खामेनी यांच्या मृत्यूनंतरही देशातील एकजूट कायम असल्याचे या अहवालात म्हटले आहे. या अहवालावर व्हाईट हाऊसकडून अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही. या युद्धाचा अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेवरही मोठा परिणाम झाल्याचं समोर आलं आहे. गुप्तचर संस्थेच्या अहवालानुसार, अमेरिकेने अवघ्या १० दिवसांत सुमारे ८३ हजार कोटी रुपयांचा खर्च केला आहे. दरम्यान, या सर्व घडामोडींनंतरही डोनाल्ड ट्रम्प यांनी युद्ध जिंकल्याचा दावा कायम ठेवला आहे. ट्रम्प यांच्या म्हणण्यानुसार, इराणचे अनेक महत्त्वाचे नेते मारले गेले असून इराणची ५८ जहाजे नष्ट करण्यात आली आहेत. तसेच इराणचे लष्कर, वायुदल आणि नौदल जवळपास उद्ध्वस्त झालं असल्याचा दावा त्यांनी केला आहे. अमेरिका जेव्हा ठरवेल तेव्हा युद्ध थआंबेल आणि ते लवकरच संपणार असल्याचा दावाही ट्रम्प यांनी केला.

------------

**आता स्वस्त धान्य दुकानांत**

त्याचा गैरवापर होत असल्याने गॅसचा काळा बाजार वाढण्याची शक्यता प्रशासनाने व्यक्त केली आहे. त्यामुळे या प्रकारावर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रशासनाने तपासणी मोहीम अधिक तीव्र करण्याचे संकेत दिले आहेत.

-----------

**जात वैधता प्रमाणपत्र हरवले आहे**

चि.निलेश विश्वनाथ पवार रा. बाराभाई तांडा ता. वडवणी जि. बीड या नावाचे जात वैधता प्रमाणपत्र बीड ते परभणी बस प्रवासा दरम्यान हरवले आहे.तरी कोणास सापडल्यास खालील नंबर वर संपर्क साधा.

-::संपर्क::-
मो. ७४९८१९१५९८

**तहसील कार्यालय, गेवराई ता.गेवराई जि.बीड**
**(दंड विभाग)**
दुरध्वनी क्र. ०२४४७-२६२१४५
e-mail-detailsgeora2@gmail.com“
क्रं.२०२५/दंड/कावि-दिनांक ०९.०३.२०२६

**जन्म नोंद आदेश मिळणे बाबत**

संदर्भ:- १) सरकारी निर्णय क्रमांक जम्रनो२५२५/ईऑ९९११८१/प्र.क्र२२/कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५

२. शेख रईस अमिरोददीन रा.संजय नगर गेवराई यांचा अर्ज दि.२०.०१.२०२६

उपरोक्त संदर्भीय विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की प्रकरणात संदर्भ क्र ०२ नूसार शेख रईस अमिरोददीन रा.सजय नगर गेवराई यानी अर्ज देवून अर्जदार यांचा जन्म दिनांक ०६.०६.१९७५ रोजी गेवराई येथे झाला असून संबंधीताची नोंद करावयाचे राहून गेल्याने प्रकरणात जन्म नोंद आदेश मिळणे बाबत या कार्यालयास संदर्भीय अर्जाव्दारे विनंती करण्यात आलेली आहे.

करीता उक्त अनुषंगाने शासन निर्णय क्रमांक जम्रनो२५२५/ईऑ९९११८१/प्र.क्र२२/कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५ नूसार प्रकरणात पो.स्टे गेवराई यांना कळविण्यात येते की, अर्जदाराचे स्थानीक जन्म/मृत्यू ठीकाणचा व रहीवासीचा तपास करून पोलीस निरीक्षक यांनी चौकशी अहवाल सादर करावा, तसेच ग्राम महसूल अधिकारी गेवराई यांनी अर्जदाराचे स्थानीक रहीवासीचा स्थानीक चौकशी/पंचनामा करून वस्तूस्थीती दर्शक अहवाल सादर करण्याची दक्षता घेण्यात यांवी

स्वाक्षरित/-
तालूका दंडाधिकारी, गेवराई

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शुक्रवार दि. १३ मार्च २०२६


## थोडक्यात

### युवकांना आधी रोजगार व व्यवसायासाठी कर्ज द्या,तरच होतील लग्न-युवकांची मागणी

पाटोदा । प्रतिनिधी

सध्याच्या काळात ग्रामीण भागातील युवकांसमोर बेरोजगारीचे मोठे संकट उभे ठाकले आहे. शिक्षण पूर्ण करूनही अनेक युवकांना नोकरी किंवा व्यवसायाच्या संधी मिळत नसल्यामुळे त्यांचे भविष्य अंधारात जात आहे. त्यामुळे युवकांना तातडीने रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात, तसेच युवा शेतकऱ्यांना व्यवसाय सुरू करण्यासाठी बँकांकडून सुलभ कर्ज उपलब्ध करून द्यावे, अशी जोरदार मागणी युवकांकडून करण्यात येत आहे.ग्रामीण भागातील अनेक तरुण शेतीसोबतच लघुउद्योग, दुग्ध व्यवसाय, शेतीपूरक उद्योग सुरू करण्यास उत्सुक आहेत. मात्र भांडवलाच्या अभावामुळे त्यांना व्यवसाय सुरू करता येत नाही. त्यामुळे शासनाने बँकांमार्फत कमी व्याजदरात कर्ज योजना राबवून युवकांना आर्थिक मदत करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.यासोबतच प्रत्येक तालुक्यात औद्योगिक विकासासाठी एमआयडीसी उभारण्यात यावी, अशीही मागणी पुढे येत आहे. जर तालुकास्तरावर उद्योगधंदे सुरू झाले तर स्थानिक युवकांना त्यांच्या गावाजवळच रोजगार मिळू शकतो. त्यामुळे स्थलांतर थांबेल आणि ग्रामीण भागाचा आर्थिक विकासही वेगाने होईल.युवकांना रोजगार मिळाला,उद्योगधंदे वाढले आणि आर्थिक स्थैर्य आले तर अनेक युवकांची लग्नेही होतील व त्यांचे कौटुंबिक जीवन स्थिर होईल. त्यामुळे शासनाने युवकांच्या या मागण्यांकडे गांभीर्याने लक्ष देऊन रोजगार निर्मितीसाठी ठोस पावले उचलावीत,अशी मागणी युवकांकडून करण्यात येत आहे.



### ज्येष्ठ विधीज्ञ ॲड.विठ्ठलराव तिडके यांचा ७५ अमृत महोत्सव साजरा

माजलगाव । प्रतिनिधी

येथील माजलगाव वकील संघाचे जेष्ठ विधिज्ञ ऍड. विठ्ठलराव तिडके यांचा ७५ वा अमृत महोत्सव साजरा माजलगाव वकील संघाच्या वतीने दि. १० मार्च मंगळवार रोजी साजरा करण्यात आला.

यावेळी वकील संघाचे ज्येष्ठ विधिज्ञ मंडळी उपस्थित होती,ऍड.विठ्ठलराव तिडके साहेब यांच्या जीवनावर ड.एस.आर शर्मा,ऍड.एम.ए.डोंगरदिवे,ऍड.बि.आर.डक, ऍड.एस.यु.सोळंके,ऍड.एन.आर.गोले,ऍड.बादाडे यांनी मनोगत व्यक्त केले.तर कार्यक्रमाचे सुत्रसंचलन वकील संघाचे सचिव ड.नारायण तेलगड यांनी केले व कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून वकील संघाचे अध्यक्ष ड.मनसबदार हे होते. सदरील कार्यक्रमास सिनियर ड.टि.एन.कोल्हे,ऍड.यु.डी.मोरे,ऍड गवते,ऍड सजगणे, ऍड फपाळ,ऍड.विजय मस्के,ऍड.राऊत,ऍड.निंबाळकर, ऍड.राठोड,ऍड.आडे, ऍड.तिडके,ऍड कुंभार,ऍड.गरड, ऍड. सोनवणे,ऍड शिंदे,ऍड.होरमाळे,ऍड खेत्री,ऍड.बोचरे, ऍड. कुलकर्णी,हिंगण यांच्यासह आदी उपस्थित होते.

# शनी मंदिर जागेच्या प्रकरणात जिल्हा अधीक्षकांच्या वक्तव्यात घुमजाव

## तक्रार होताच रोजनामा गायब? १८ नोव्हेंबरचा रोजनामा अदृश्य

बीड । प्रतिनिधी

शहरातील शनी मंदिर जागेच्या प्रकरणात १८ नोव्हेंबर २०२५ च्या सुनावणी आणि रोजनाम्याभोवती गूढ निर्माण झाले असून जिल्हा अधीक्षकांच्या परस्परविरोधी वक्तव्यांमुळे संपूर्ण प्रकरणावर संशयाची छाया पडली आहे. उपलब्ध व्हिडिओंमधून समोर आलेल्या माहितीनुसार या प्रकरणातील नोंदी आणि प्रत्यक्ष घडामोडींमध्ये विसंगती असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

माहितीनुसार २२ फेब्रुवारी २०२६ रोजीच्या व्हिडिओमध्ये जिल्हा अधीक्षकांनी १८ नोव्हेंबर २०२५ रोजी शनी मंदिर जागेचे प्रकरण आदेशासाठी बंद केल्याचे सांगितले आहे. मात्र त्यानंतर ११ मार्च २०२६ रोजीच्या दुसऱ्या व्हिडिओमध्ये तेच जिल्हा अधीक्षक त्या दिवशी कोणताही रोजनामा लिहिला नसल्याचे आणि कोणतीही सुनावणी झाली नसल्याचे म्हणताना दिसतात. याउलट, प्रकरणाची फाईल सांभाळणारा क्लार्क सांगतो की १८ नोव्हेंबर २०२५ रोजी सुनावणी झाली होती आणि त्यानुसार पुढील तारखा देण्यात आल्या. त्यामुळे एकाच तारखेबाबत तीन वेगवेगळी विधाने समोर आल्याने प्रकरण अधिकच संशयास्पद बनले आहे.

या पार्श्वभूमीवर काही गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. जर १८ नोव्हेंबर २०२५ रोजी सुनावणी झालीच नाही, तर त्या दिवशी पुढील तारीख कशी देण्यात आली? त्या दिवशी लेखी व्यक्तिवाद (लेखी निवेदन) कसा स्वीकारण्यात आला? पूर्वीच्या रोजनाम्यात पुढील तारीख १८ नोव्हेंबर अशी नोंद कशी झाली? आणि शनी मंदिर प्रकरणाच्या तारखेचा बोर्ड जाणीवपूर्वक का लावण्यात आला नाही? अशा अनेक प्रश्नांमुळे या प्रकरणातील नोंदींची सत्यता तपासण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, संबंधित प्रकरणाबाबत वरिष्ठांकडे तक्रार दिल्यानंतर १८ नोव्हेंबर २०२५ चा रोजनामा नोंदीतून गायब झाल्याचा आरोप पुढे आला आहे. त्यामुळे हा प्रकार शनी मंदिराच्या जागेच्या प्रकरणातील नोंदींमध्ये छेडछाड करून सत्य दडवण्याचा प्रयत्न तर नाही ना, असा संशय व्यक्त होत आहे.

या संदर्भात एका सामाजिक कार्यकर्त्याने प्रतिक्रिया देताना सांगितले, ''एकाच तारखेबाबत तीन वेगवेगळी विधाने समोर येणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. जर सुनावणी झाली नसेल तर प्रकरण बंद कसे झाले आणि जर सुनावणी झाली असेल तर रोजनामा कुठे गेला? तक्रार दिल्यानंतरच नोंदी गायब होणे हा योगायोग मानणे कठीण आहे. या संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी होऊन सत्य समोर येणे आवश्यक आहे. एकूणच प्रकरण बंद केले, सुनावणी झाली नाही आणि सुनावणी झाली होती, अशी परस्परविरोधी माहिती समोर येत असल्याने भूमी अभिलेख विभागाच्या कामकाजावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. त्यामुळे १८ नोव्हेंबर २०२५ चा रोजनामा नेमका कुठे आहे आणि या प्रकरणातील वास्तविक सत्य काय आहे, याबाबत आता चौकशीची मागणी जोर धरत आहे.

# पत्रकार दादासाहेब खेडकर अमानुष मारहाण प्रकरणी पीएसआय संदीप ढाकणे यांच्यावर कारवाई कधी?

**पाथर्डी । प्रतिनिधी**

पाथर्डी तालुक्यातील भगवानगड परिसर प्रेस क्लबचे अध्यक्ष व पत्रकार प्रा.दादासाहेब खेडकर हे खरवंडी कासार येथे बारावी बोर्डाची परीक्षा सुरू असताना वार्तांकन करण्यासाठी जवळवाडी रोड येथील संत भगवानबाबा उच्च माध्यमिक विद्यालयाकडे जात असताना बारावीच्या पहिल्या इंग्रजीच्या पेपरला छत्रपती संभाजीनगर पुणे मुंबई बीड जालना अशा पाच ते सात जिल्ह्यातून बाहेरील विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ट झालेले असल्याने पालकांची तुफान गर्दी होती ट्राफिक जाम झाल्याने आणि पालकांचा मोठा जमाव असल्याने गर्दीतून गाडी काढणे शक्य नव्हते अशा परिस्थितीत पालकांना परीक्षा केंद्र बाहेर पाचशे मीटरच्या आत न येऊ देणे व ट्राफिक अशा दुहेरी परिस्थितीत पोलीस बंदोबस्त सांभाळणारे पोलीस उपनिरीक्षक संदीप ढाकणे याने पत्रकार दादासाहेब खेडकर यांना अमानुष मारहाण केली आणि नायब तहसीलदार किशोर सानप यांनी खोटी फिर्याद देऊन खोटे गुन्हे दाखल केले अमानुष मारहाण झाल्याने दादासाहेब खेडकर हे आठ दिवस गंभीर दुखापतग्रस्त होते त्यांनी उपजिल्हा रुग्णालय पाथर्डी खरवंडी कासार प्राथमिक आरोग्य केंद्र व खाजगी रुग्णालयात उपचार घेऊन अहिल्यानगर पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांना भगवानगड परिसर प्रेस क्लब पत्रकार संघटनेच्या वतीने लेखी निवेदन देऊन पोलीस उपनिरीक्षक संदीप ढाकणे व विलास जाधव यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची व पत्रकाराला अमानुष मारहाण करत मानवी हक्कांचे उल्लंघन करणे आणि कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी निलंबनाची मागणी केली आहे तशा स्वरूपाचा लेखी अर्ज पोलीस तक्रार प्राधिकरण नाशिक मानवअधिकार विभाग यांच्याकडे केला आहे.

पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी चौकशीचे आदेश देऊनही चौकशी अहवाल देण्यास टाळाटाळ !

चौकट - पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी पत्रकार दादासाहेब खेडकर यांच्यावर झालेल्या अमानुष मारहाण प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश शेवगाव पोलीस उपअधीक्षक नीरज राजगुरू यांना दिले तसे पत्रही प्राप्त झाले आहे परंतु चौकशीचा स्पष्ट अहवाल का दिला नाही पोलीस उपअधीक्षक नीरज राजगुरू यांनी कायदेशीर कारवाई केली नसल्याने पोलीस उपनिरीक्षक संदीप ढाकणे व विलास जाधव यांच्यावर कारवाई न करण्यासाठी पोलीस उपअधीक्षक नीरज राजगुरू यांच्यावर दबाव आहे का हा प्रश्न आहे !

## पान ६ वरुन...

### गावच्या विकासाला खीळ

नसणे, मासिक बैठकांचा अभाव, पथदिव्यांची दुरवस्था आणि स्वच्छतेचा प्रश्न यांमुळे ग्रामस्थ त्रस्त असल्याचे त्यांनी नमूद केले. केवळ मूलभूत सुविधाच नव्हे, तर महसुली कामांतही मोठा गोंधळ असल्याचा आरोप दहिफळे यांनी केला आहे. गावठाण जमिनीवर चुकीची अतिक्रमणे होणे, पीटीआर रजिस्टरमध्ये चुकीच्या नोंदी करणे आणि ग्रामसेवकांनी वित्त आयोगाच्या निधीचा हिशोब न देणे अशा गंभीर बाबी त्यांनी उघड केल्या आहेत. ''सरपंच आणि ग्रामसेवक यांच्या मनमानी कारभारामुळे मी जनतेला दिलेली आश्वासने पूर्ण करू शकलो नाही, त्यामुळे मी पदावर राहण्यास इच्छुक नाही,'' असे त्यांनी पत्रात म्हटले आहे. या राजीनाम्याच्या प्रती जिल्हाधिकारी (बीड), उपजिल्हाधिकारी (अंबाजोगाई) आणि तहसीलदार यांनाही पाठवण्यात आल्या आहेत. यावेळी गावातील जेष्ठ नेतेसर्वश्री अंगदराव दहीफळे , माजी सरपंच पांडुरंग दहिफळे, अरुण दहिफळे माजी चेअरमन,सिद्धेश्वर मधुकर गुट्टे,रवींद्र मुंडे,नाथराव गुट्टे, जनार्धन दहिफळे,मंचक गुट्टे, लिंबाजी दहिफळे, मधुकर दहिफळे, हरिश्चंद्र महाराज गुट्टे,पंढरी गित्ते, पंडित दहिफळे,ज्ञानोबा पेंटूळे,, धनराज मुंडे आदीजन उपस्थित होते

### वनविभागातील कृत्रिम

सोडलेल्या पाण्यात मोठ्या प्रमाणात शेवाळ साचल्याने ते पाणी पिण्यास अयोग्य झाले आहे. वन्यजीव पाण्यासाठी मानवी वस्तीकडे येत असल्याने त्यांच्यावर भटक्या कुत्र्यांचे हल्ले होण्याचा तसेच अज्ञात वाहनांच्या धडकेत जीव गमावण्याचा धोका वाढला आहे. त्यामुळे वनविभागाने कृत्रिम पाणवठ्यांमध्ये नियमितपणे स्वच्छ पाणी सोडून वन्यजीवांसाठी पाण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी वनविभागाच्या अधिकाऱ्यांकडे केली आहे.

### कामगारानेच मारला सराफा

उघडण्यात आले व तिजोरीतील साहित्य बाहेर काढले व शोकेसमध्ये ठेवण्यात आले. त्यासोबतच ठेवलेली रक्कम तीन लाख रुपये तिजोरीतून काढून कांऊटरमध्ये ठेवण्यात आली व दुकानाची साफसफाई झाल्यानंतर काही वेळाने मी जमा रक्कम तपासली असता त्यामधील पन्नास हजार रुपये कमी असल्याची माझी खात्री झाल्यानंतर दुकानातील नौकरांना याबाबत विचारणा केली असता त्यांनी माहित नसल्याचे सांगितले. नंतर सीसीटीव्ही कॅमेरे रेकॉर्डिंग चेक केले त्यामध्ये आमचे दुकानातील कामगार अमोल सुभाष चव्हाण याने काऊंटरमध्ये ठेवलेल्या तीन लाख रुपयांपैकी पन्नास हजार रुपये चोरी केले असल्याचे स्पष्टपणे दिसून आले. तसेच त्याचबरोबर दुकानात तो इतर साहित्याची चोरी करत असतांना सीसीटीव्हीमध्ये दिसून आला. त्यावर सर्व माल तपासला असता त्यामध्ये कानातील सोन्याचे टाप्स तीन जोड ७.९५० ग्रॅम वजनाचे ज्याची किंमत १ लाख २७ हजार २०० रुपये, सोन्याचा हार ३१.८५० ग्रॅम वजनाचे ज्याची किंमत ४ लाख रुपये व रोख पाचशे रुपयांच्या १०० नोटांचे बंडल ५० हजार रुपये असे वरील वर्णनाचे एकूण ५ लाख ७७ हजार २०० रुपयांचे सोन्याचे दागिने व नगदी रुपये माझ्या दुकानात काम करणारा नोकर अमोल सुभाष चव्हाण याने चोरी केले आहेत. तसेच वर नमूद चोरी केलेल्या वर्णना व्यतिरीक्त दुकानातील सोन्याचे दागिने चांदीची साखळी ३० ग्रॅम वजनाची किंमत ७ हजार ५०० रुपये, सोन्याचा लेडीज गळ्यातील पॅन्डल ३.५० ग्रॅम वजनाचे किंमत ४९ हजार रुपये, नाकनातील सोन्याचा गुंड ०.२५० मिली किंमत ३ हजार ५०० रुपये, सोन्याची अंगठी २ ग्रॅम वजनाची किंमत २९ हजार रुपये, सोन्याची अंगठी १.५० ग्रॅम वजनाची किंमत २१ हजार रुपये, व नगदी चोरी केलेले ८२ हजार रुपये असे हे देखील दागिने व रोख रक्कम अमोल सुभाष चव्हाण यानेच चोरी केलेली आहेत. याच्या बदल्यात त्याने रोख ९९ हजार रुपये आणि ऑनलाईन व रोख ४३ हजार रुपये हे वापस दिलेले आहेत. परंतू उर्वरीत सोन्याचे दागिने व नगदी रुपये मागितले असता आज देतो, उद्या देतो असे म्हणून माझ्यावर केस करु नका अशी विनंती केली होती. मात्र त्याने पूर्णपणे घुमजाव केल्याने दि.१२ मार्च २०२६ रोजी विनय माणिकचंद नहार यांच्या फिर्यादीवरुन आरोपी नौकर अमोल सुभाष चव्हाण रा.कान्हापूर तांडा, या.वडवणी याच्याविरोधात भारतीय न्याय संहिता २०२३ कलम ३०६ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास वडवणी पोलीस करत आहेत.

### अलिझा इरफान शेखने

उत्साहात आपला उपवास पूर्ण केला. सायंकाळी इफ्तारच्या वेळी अलिझाने अल्लाच्या चरणी प्रार्थना केली आणि आपला रोजा सोडला.

कुटुंबीय आणि शिक्षकांकडून कौतुक

लहान वयातच अलिझाने दाखवलेली ही धार्मिक निष्ठा आणि संयम पाहून तिचे वडील इरफान शेख आणि कुटुंबीयांनी तिचे भरभरून कौतुक केले आहे. एवढ्या लहान वयात कडक नियमांचे पालन करून रोजा पूर्ण करणे ही सोपी गोष्ट नाही, अशा शब्दांत प्रियदर्शनी प्राथमिक शाळेतील शिक्षक मोरे सर आणि स्थानिक नागरिकांनीही तिचे अभिनंदन केले आहे.अलिझाच्या या यशाबद्दल पाटोदा परिसरात तिच्यावर कौतुकाचा वर्षाव होत असून, सोशल मीडियावरही तिच्या या जिद्दीची चर्चा रंगली आहे.

### नगराध्यक्ष प्रेमलताताई पारवे

स्वच्छता विभागाशी संबंधित अधिकारी, अभियंता आणि कर्मचारी उपस्थित होते. नगराध्यक्षांच्या टीमने पेठ बीड भागातील पाणी पुरवठ्याच्या प्लांटला भेट दिली. जलशुध्दीकरणाच्या प्रक्रियेची माहिती घेत दैनंदिन उपलब्ध होणारा पाणीसाठा आणि पाणी पुरवठ्याचे नियोजन याचा आढावा घेतला. कामात हयगय करू नका, पाणी पुरवठा ही अत्यावश्यक बाब असून सध्याच्या परिस्थितीत प्रथम प्राधान्याने पाणी पुरवठ्यावर लक्ष केंद्रीत करा अशा सुचना नगराध्यक्षांनी दिल्या. त्यानंतर पेठ बीड भागासह बालेपीर मधील ईदगाह मैदानाची ईदच्या अनुषंगाने पाहणी करून तातडीने स्वच्छता करून घेण्याच्या सुचना दिल्या. त्याचबरोबर पुढील महिन्यात होत असलेल्या भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सवाच्या अनुषंगाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा परिसराला भेट दिली. तेथील विद्युत सुविधा, कारंजे याची माहिती घेऊन त्या तात्काळ सुरळीत करण्याच्या सुचना केल्या. तेथील हिरवळ पुर्णपणे सुकून जाऊ लागली आहे. त्या अनुषंगानेही त्यांनी संबंधित यंत्रणेला सुचना करत संपुर्ण पुतळा परिसराच्या सुशोभीकरणाचे काम तात्काळ हाती घेऊन जयंती उत्सवाच्या आधी ते पुर्ण करा अशा सूचनाही केल्या. नगराध्यक्षांच्या टीमने भर उन्हात शहरातील विविध भागांना भेटी देत तेथील अडचणी, समस्या जाणून घेतल्या आणि त्यावर तातडीने उपाययोजना करण्याच्या सुचना देखील दिल्या आहेत.

### पाटोद्यात कृत्रिम टंचाई

कारभारामुळे गोरगरीब जनतेच्या चुली विझण्याची वेळ आली आहे. जिल्हाधिकारी साहेबांनी स्वतः या प्रकरणात लक्ष घालून, गॅस एजन्सींच्या साठ्याची ( ) अचानक तपासणी करावी आणि दोषींवर गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी पाटोदा शहरातील नागरिक करत आहेत. जर यावर तात्काळ आळा घातला नाही, तर नागरिक रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याच्या पवित्र्यात आहेत.

## अल्पवयीन मुलीवर अत्याचार प्रकरणी दोन्ही आरोपीस १० वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा

**बीड । प्रतिनिधी**

पिडीत अल्पवयीन मुलीवर बळजबरीने लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी आरोपी नामे जीवन रघुनाथ सरवदे, रा. इंद्रप्रस्त कॉलनी बालेपीर, ता. जि. बीड व आरोपीस गुन्हयात सहकार्य केल्याबद्दल आरोपी नामे सारीका रामेश्वर भोसले, रा. कोकस्को मज्जीत पाठीमागे केज ह.मु. एकता कॉलनी गणेश नगर शास्त्री चौक भोसरी पुणे यांना मा. व्ही.एच. पाटवदकर, अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश- १ तथा विशेष न्यायाधीश, बीड यांनी दोषी ठरवून आरोपी नंबर १ यांस १० वर्ष सश्रम कारावास व एकत्रितपणे ९,०००/- रुपये दंड व दंड न भरल्यास एकत्रितपणे ९ महिने साधा कारावास व आरोपी नंबर २ हिस १० वर्ष सश्रम कारावास व ३,०००/- रुपये दंड व दंड न भरल्यास ३ महिने साधा कारावास यांस एवढ्या दंडाची शिक्षा ठोठावली आहे.



पिडीतेच्या वडीलांच्या फिर्यादीवरून पोलीस स्टेशन शिवाजीनगर येथे आरोपी विरूध्द कलम ३६३, ३६६(अ), ३७६(२) (जे) (एन) भादंवी आणि कलम ४, १७ बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंध कायदा सन २०१२ प्रमाणे गुन्हा नोंदवण्यात आला. सदर फिर्यादीवरून तात्कालीन पोलीस उपनिरीक्षक एम.बी.तुपे यांनी या प्रकरणाचा तपास केला व जिल्हा व सत्र न्यायालय तथा विशेष न्यायालय, बीड येथे आरोपी विरूद्ध दोषारोपपत्र दाखल केले. सदर प्रकरणाची सुनावनी मा. व्ही.एच. पाटवदकर, अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश - १ तथा विशेष न्यायाधीश यांनी आरोपी नं.१ यास ३ वर्ष सश्रम कारावास तसेच आरोपी नंबर २ सारीका रामेश्वर भोसले हिस आरोपीस गुन्हयात सहकार्य केल्याबद्दल कलम १७ बाल लैंगिक

अत्याचार प्रतिबंधक अन्वये दोषी ठरवनु १० वर्ष सश्रम कारावास व ३,०००/- रूपये दंड व दंड न भरल्यास ३ महिने साधा कारावासाची शिक्षा सुनावली आहे.

सदर प्रकरणात सहा. सरकारी वकिल अमित पी. हसेगांवकर यांनी काम पाहिले व त्यांना कोर्ट पैरवी पी.एस. गव्हाणे सफौ/५५६, कोर्ट ड्युटी रंजना बरडे, शिवाजी नगर पोलीस स्टेशन यांनी सहकार्य केले.

## सौताडा-जामखेड घाटात मृत्यूचे तांडव सुरूच; विटांचा ट्रक पलटी, प्रशासन अजून किती बळींची वाट पाहतंय?

**पाटोदा । प्रतिनिधी**

**सौताडा-जामखेड घाटातील रस्ते कामाचा रेंगाळलेला प्रश्न आता प्रवाशांच्या जीवावर बेतू लागला आहे. आज पुन्हा एकदा विटांनी भरलेला एक मोठा ट्रक या घाटात पलटी झाला. सुदैवाने, या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र वारंवार होणाऱ्या या अपघातांमुळे ''प्रशासन झोपले आहे की झोपेचे सोंग घेत आहे?'' असा संतप्त सवाल आता सामान्य नागरिक विचारत आहेत.**



५ वर्षे, ११ किमी रस्ता आणि भ्रष्टाचाराचा नमुना

गेल्या सव्वा पाच वर्षांपासून केवळ ११ किलोमीटर अंतराच्या रस्त्याचे काम सुरू आहे. इतक्या प्रदीर्घ काळात डोंगर पोखरून नवे मार्ग तयार केले जातात, मात्र येथे साध्या रस्त्याचे काम पूर्ण होऊ शकलेले नाही. जे काम झाले आहे, त्याचा दर्जा अत्यंत निकृष्ट असून रस्ता ठिकठिकाणी उखडला आहे. हे काम म्हणजे केवळ भ्रष्टाचाराचा एक नमुना असल्याची चर्चा आता जोर धरू लागली आहे.

अर्धवट पुलांमुळे दर आठवड्याला अपघात

घाटातील पुलांची कामे अर्धवट अवस्थेत सोडून देण्यात आली आहेत. याचा फटका वाहनधारकांना बसत असून, दर आठवड्याला या ठिकाणी २ ते ३ भीषण अपघात होत आहेत. प्रत्येक वेळी नशीब साथ देईलच असे नाही; एखादा मोठा अनर्थ घडल्यावरच प्रशासनाला जाग येणार का? असा प्रश्न प्रवासी विचारत आहेत.

गुन्हेगारांवर फौजदारी कारवाईची मागणी

रस्त्याच्या कामात चालढकल करणाऱ्या आणि निकृष्ट दर्जाचे काम करून लोकांचा जीव धोक्यात घालणाऱ्या संबंधित ठेकेदारावर (गुत्तेदार) तात्काळ फौजदारी गुन्हा दाखल करावा, अशी मागणी आता जोर धरत आहे. प्रवाशांच्या जिवाशी खेळणाऱ्या या निर्दयी कारभाराचा पंचक्रोशीतील नागरिकांनी तीव्र निषेध केला आहे. आता तरी शासन आणि प्रशासन या मृत्यूच्या सापळ्यातून प्रवाशांची मुक्तता करणार का, की आणखी एखाद्या मोठ्या अपघाताची प्रतीक्षा करणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

## चौसाळा राम जन्मोत्सवाच्या अध्यक्षपदी प्रसाद देशमुख तर सचिवपदी रविराज वेदपाठक

चौसाळा । प्रतिनिधी

२६ मार्च २०२६ रोजी रामनवमी निमित्त चौसाळा येथे राम जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो . राम जन्मोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष संदेशशेठ खिवंसरा यांच्या अध्यक्षतेखाली हनुमान मंदिरात बैठक संपन्न होऊन राम जन्मोत्सवाची कार्यकारिणी घोषित करण्यात आली मार्गदर्शक म्हणून बाळू काका नहार महादेव बाप्पा नाईकवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रसाद ( बाबू) देशमुख यांना राम जन्मोत्सवाचे अध्यक्ष म्हणून निवडण्यात आले तर उपाध्यक्ष म्हणून आकाश काळे कोषाध्यक्ष म्हणून कुमार मिटकरी सचिव म्हणून रविराज वेदपाठक यांची निवड करण्यात आली राम जन्मउत्सवाचा कार्यक्रम बंकट शिंदे, अक्षय भैय्या हुलजुते, महावीर लिंगे व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत यशस्वीरित्या पार पाडण्याचे या बैठकीत ठरवण्यात आले बैठकीमध्ये प्रसिद्धी प्रमुख म्हणून दैनिक कार्यारंभ चे पत्रकार व ग्रामपंचायत सदस्य विकास नाईकवाडे, दैनिक लोकप्रश्न चे वार्ताहार विकास सर्वज्ञ यांची निवड करण्यात आली तसेच वेगवेगळया जबाबदाऱ्या ठरवून देण्यात आल्या राम जन्मोत्सवा दिवशी झांज पथक, तलवारबाजी व साहसी खेळ यांचे आयोजन करण्यात येईल असे जन्मोत्सव समितीच्या वतीने कळविण्यात आले या नूतन कार्यकारिणीचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे चौसाळाचे प्रथम नागरिक बाबुशेठ लोढा, माझी सरपंच मधुकर तोडकर, अंगद शिंदे, ग्रामपंचायत सदस्य गौतम नाईकवाडे सामाजिक कार्यकर्ते पंजाब राऊत यांनी सर्वांचे अभिनंदन केले यावेळी बैठकीस आनंद चौसाळकर, शंकर मिटकरी, अमोल शेटे, तात्यासाहेब चौधरी, योगेश भवर, महेश पवार, तन्मय देशमुख तसेच अनेक मान्यवर व प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जाहीर प्रगटन

**तहसील कार्यालय, गेवराई ता. गेवराई जि. बीड**
**(दंड विभाग)**

दूरध्वनी ०२४४७-२६२१४१ दिनांक ०५.०३.२०२६
२०२५/दंड/कावि-
विषय-जन्म नोंद आदेश मिळणे बाबत
संदर्भ: -१. शासन निर्णय क्रमांक जम्रनो २५२५/ ईऑ ९९११८ १/प्र.क्र.२२/कु.क.नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५
२.अर्जदार-कानडे शोभा प्रल्हाद, लग्नानंतरचे नाव सीमा शाकेर सय्यद रा.गेवराई ता.गेवराई यांचा अर्ज दिनांक २३.०२.२०२६

उपरोक्त संदर्भीय विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, प्रकरणात संदर्भ क ०२ नुसार अर्जदार कानडे शोभा प्रल्हाद, लग्नानंतरचे नाव सीमा शाकेर सय्यद रा.गेवराई ता.गेवराई यांनी अर्ज देवून अर्जदार यांचा जन्म दिनांक ०१.०१.१९८७ रोजी गेवराई येथे झाला असून अर्जदार यास कायद्याचे ज्ञान नसल्यामुळे जन्म नोंद करावयाचे राहून गेल्याने प्रकरणात जन्म आदेश मिळणे बाबत या कार्यालयात संदर्भीय अर्जादाने विनंती करण्यात आलेली आहे.

करीता उकत अनुषंगाने शासन निर्णय क्रमांक जम्रनो २५२५/ईऑ ९९११८१)/प्र.क्र.२२/कु.क नविन मंत्रालय मुबई दिनांक १२.०३.२०२५ नुसार प्रकरणात पो स्टे गेवराई यांना कळविण्यात येते की, अर्जदाराचे स्थानीक जन्म मृत्यु ठीकाणचा व रहीवासींचा तपास करून पोलीस निरीक्षक यांनी चौकशी अहवाल सादर करावा, तसेच ग्राम महसूल अधिकारी गेवराई यांनी अर्जदाराचे स्थानीक राहीवासीचा स्थानीक चौकशी/पंचनामा करून वस्तूस्थितीदर्शक अहवाल सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी

**स्वाक्षरित/-**
**तालुका दंडाधिकारी गेवराई**

### जाहीर प्रगटन

**तहसील कार्यालय, गेवराई ता. गेवराई जि. बीड**
**(दंड विभाग)**

दूरध्वनी ०२४४७-२६२१४१ दिनांक ०६.११.२०२५
२०२५/दंड/कावि-
विषय-जन्म नोंद आदेश मिळणे बाबत
संदर्भ: -१. शासन निर्णय क्रमांक जम्रनो २५२५/ ईऑ ९९११८ १/प्र.क्र.२२/कु.क.नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५
२. अर्जदार कटुमियाँ सरदार शेख रा.गेवराई ता.गेवराई यांचा अर्ज दिनांक १७.१२.२०२५

उपरोक्त संदर्भीय विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, प्रकरणात संदर्भ क ०२ नूसार अर्जदार कटुमियॉ सरदार शेख रा. गेवराई ता. गेवराई जि.बीड यांनी अर्ज देवून अर्जदार यांचा मुलगा आहील कटुमियॉ शेख यांचा जन्म दिनांक ०१.१२.२०२१ रोजी गेवराई येथे झाला असून अर्जदार यास कायद्याचे ज्ञान नसल्यामुळे जन्म नोंद करावयाचे राहून गेल्याने प्रकरणात जन्म आदेश मिळणे बाबत या कार्यालयात संदर्भीय अर्जादाने विनंती करण्यात आलेली आहे.

करीता उकत अनुषंगाने शासन निर्णय क्रमांक जम्रनो २५२५/ईऑ ९९११८१)/प्र.क्र.२२/कु.क नविन मंत्रालय मुबई दिनांक १२.०३.२०२५ नुसार प्रकरणात पो स्टे गेवराई यांना कळविण्यात येते की, अर्जदाराचे स्थानीक जन्म मृत्यु ठीकाणचा व रहीवासींचा तपास करून पोलीस निरीक्षक यांनी चौकशी अहवाल सादर करावा, तसेच ग्राम महसूल अधिकारी गेवराई यांनी अर्जदाराचे स्थानीक राहीवासीचा स्थानीक चौकशी/पंचनामा करून वस्तूस्थितीदर्शक अहवाल सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी

**स्वाक्षरित/-**
**तालुका दंडाधिकारी गेवराई**

# राज्यात १२६ कारखान्यांची धुराडी बंद

## ९५ लाख टन साखर उत्पादन; सर्वाधिक साखर उतारा कोल्हापूरचा

पुणे : राज्यातील यंदाचा साखर हंगाम संपण्याच्या मार्गावर असून यंदा सुरू झालेल्या २१० सहकारी व खासगी साखर कारखान्यांपैकी आतापर्यंत १२६ कारखान्यांनी आपली धुराडी बंद केली आहेत. राज्यात आतापर्यंत १ हजार १० लाख टन उसाचे गाळप झाले असून, ९५ लाख ६९ हजार टन साखरेचे उत्पादन झाले आहे. या गाळपातून ९.७४ टक्के साखर उतारा मिळाला आहे. सर्वाधिक २३ लाख टन साखरेचे उत्पादन कोल्हापूर विभागातून झाले असून पुणे विभागात २१ लाख टन साखर उत्पादित करण्यात आली आहे.

यंदा राज्यातील २१० सहकारी व खासगी कारखान्यांनी साखर आयुक्त कार्यालयाकडून गाळपाचे परवाने घेतले होते. यंदा पावसाळा लांबल्याने गाळप हंगामाला उशीर होईल, अशी शक्यता वर्तवण्यात होती. मात्र, मुख्यमंत्र्यांच्या बैठकीत गाळप हंगाम एक नोव्हेंबर रोजी सुरू करण्याचे निश्चित करण्यात आले. गेल्यावर्षी लागवड झालेल्या उसाचे क्षेत्र तुलनेने कमी असल्याने गाळपास येणारा ऊस हा कारखान्याच्या




गाळप क्षमतेच्या तुलनेत कमी होता. त्यामुळे यंदाचा गाळप हंगाम मार्चअखेरीस संपेल, असे राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे म्हणणे होते. त्यानुसार राज्यात आतापर्यंत १२६ कारखान्यांची धुराडी बंद झाली आहेत. तर ८४ कारखाने अद्यापही सुरू आहेत. या कारखान्यांनी आतापर्यंत १ हजार १० लाख टन उसाचे गाळप केले असून, यातून ९५ लाख ६९ हजार टन साखरेचे उत्पादन झाले आहे. या हंगामात आतापर्यंत ९.४७ टक्के साखर उतारा मिळाला आहे. कोल्हापूर विभागात २३ लाख १० हजार टन, तर त्याखालोखाल पुणे विभागात २१ लाख ३० हजार टन साखरेचे उत्पादन झाले आहे. सोलापूर विभागात १८ लाख ४८ हजार, अहिल्यानगर विभागात ११ लाख ३१ हजार, छत्रपती संभाजीनगर विभागात ८ लाख ८४ हजार, नांदेड विभागात १ लाख १४ हजार, अमरावती विभागात १ लाख १० हजार टन साखर उत्पादित झाली आहे. साखर उताऱ्याचा विचार करता कोल्हापूर विभागात सर्वाधिक ११.०१ टक्के साखर उतारा मिळाला असून, त्याखालोखाल पुणे विभागात ९.८४ टक्के उतारा मिळाला आहे. नांदेड विभागात ९.३८, अमरावती विभागात ९.३२, अहिल्यानगर विभागात ९.०७, तर सोलापूर विभागात ८.५७ टक्के साखर उतारा मिळाला आहे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१७८१ : विल्यम हर्षेल याने युरेनसचा शोध लावला.
१८५४ : नागपूर रियासतीची समाप्ती झाली.
१८९७ : सॅन डीयेगो विद्यापीठाची स्थापना झाली.
१९१० : पॅरिसहुन लंडनला येताच स्वातंत्र्यवीर सावरकर यांना अटक झाली.
१९२८ : कुमारी नॅन्सी मिलरचा हिंदू धर्मात प्रवेश झाला
१९३० : क्लाईड डब्ल्यू. टॉमबॉग या शास्त्रज्ञाने प्लूटो ग्रह शोधल्याचे हारवर्ड कॉलेज येथील वेधशाळेला कळवले. मात्र या ग्रहाचा शोध त्याला १८ फेब्रुवारी १९३० या दिवशीच लागला होता.
१९४० : अमृतसर येथील जालियनवाला बाग हत्याकांडाचे समर्थन करणारे पंजाबचे गव्हर्नर मायकेल ओडवायर यांची उधमसिंग यांनी गोळया घालून हत्या केली.
१९६३ : अर्जुन पुरस्काराची सुरुवात
१९९७ : कोलकात्यातील मिशनरीज् ऑफ चॅरिटीने मदर तेरेसांची वारस म्हणून सिस्टर निर्मला यांची निवड केली.
१९९७ : मदर तेरेसा यांचे वारस म्हणून कोलकात्यातील 'मिशनरीज ऑफ चॅरिटीज' ने सिस्टर निर्मला यांची नियुक्ती केली.
१९९९ : जलाशयाच्या तळाला भोक पाडून त्यातील पाणी बोगद्याच्या साह्याने भूमिगत जलविद्युतगृअहात नेऊन त्याद्वारे वीजनिर्मिती करणाऱ्या आशिया खंडातील पहिल्या प्रयोगाच्याकोयना जलविद्युत प्रकल्पाच्या चौथ्या टप्प्याचे उद्‌घाटन.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७३३ : जोसेफ प्रिस्टले – इंग्लिश रसायनशास्त्रज्ञ (मृत्यू: ६ फेब्रुवारी १८०४)
१८९३ : डॉ. वासुदेव विष्णू मिराशी – महामहोपाध्याय, संस्कृत विद्वान, प्राच्यविद्यासंशोधक (मृत्यू: ३ एप्रिल १९८५)
१८९९ : हैदराबाद राज्याचे पहिले मुख्यमंत्री डॉ. बर्गुला रामकृष्ण राव यांचा जन्मदिवस.
१९२६ : रविन्द्र पिंगे – ललित लेखक (मृत्यू: १७ आक्टोबर २००८)
१९७१ : हिंदी भाषिक कवी आत्मा रंजन यांचा जन्मदिन.
१९८० : भारतीय राजकारणी नेता, भारतीय लोकसभा सदस्य आणि संजय गांधी यांचे पुत्र वरून गांधी यांचा जन्मदिवस.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८०० : बाळाजी जनार्दन भानू उर्फ 'नाना फडणवीस' – पेशव्यांच्या दरबारी असणारे मराठा साम्राज्यातील मुत्सद्दी, पेशवाईतील साडेतीन शहाण्यांपैकी हे अर्धे शहाणे. (जन्म: १२ फेब्रुवारी १७४२ सातारा)
१८९९ : दत्तात्रेय कोंडो घाटे ऊर्फ 'कवी दत्त' (जन्म: २७ जून १८७५)
१९०१ : बेंजामिन हॅरिसन – अमेरिकेचे वे३३ राष्ट्राध्यक्ष (जन्म: १८३३)
१९५५ : वीर विक्रम शाह 'त्रिभुवन' – नेपाळचे राजे (जन्म: १९०६)
१९६७ : सर फँक वॉरेल – वेस्ट इंडिजचे क्रिकेट खेळाडू (जन्म: १९२४)
१९६९ : मोहिनीराज लक्ष्मण दत्तात्रय, – भारतीय गणितशास्त्रज्ञ.
१९९४ : श्रीपाद यशवंत कोल्हटकर – मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे ज्येष्ठ नेते व 'सिटू' या कामगार संघटनेचे लढवय्ये नेते.
१९९६ : शफी इनामदार – अभिनेते व नाट्यनिर्माते (जन्म: १९४५)
१९९७ : शीला इराणी – राष्ट्रीय महिला हॉकी खेळाडू व संघटक.
२००२ : भारतीय चित्रपट निर्माता, दिग्दर्शक, आणि पटकथा लेखक मोहम्मद नासिर हुसेन खान यांचे निधन.
२००४ : उस्ताद विलायत खाँ – सतारवादक (जन्म: २८ ऑगस्ट १९२८)
२००६ : चिकन नुग्गेत चे निर्माते रॉबर्ट सी बेकर यांचे निधन. (जन्म: २९ डिसेंबर १९२१).

# सुपर नेपियर चाऱ्याची लागवड करा; वर्षभर मिळेल मुबलक चारा!



शेतीला जोडधंदा म्हणून पशुपालन व्यवसाय मोठ्या प्रमाणावर केला जातो. पशुपालनामध्ये सगळ्यात जास्त चाऱ्याची आवश्यकता असते. कारण पशुपालकांचा सगळ्यात जास्त खर्च हा जनावरांच्या चारा व्यवस्थापनावर होतो. जनावरांना चाऱ्याची उपलब्धता व्हावी, यासाठी शेतकरी वेगवेगळ्या प्रकारच्या चाराची लागवड करतात. परंतु बऱ्याच शेतकऱ्यांची समस्या असते की त्यांचा पशुपालनाचा आवाका मोठा असतो. परंतु त्यामानाने त्यांच्याकडे उपलब्ध चारा लागवडीसाठीचे क्षेत्र कमी असते व असे पशुपालक हे चारा विकत घेऊन जनावरांची आहाराची गरज भागवतात.

सुपर नेपियर गवत : सुपर नेपियर गवत हे मूळचे थायलंड या देशातील असून, आपल्याकडे देखील मोठ्या प्रमाणात या गवताची लागवड केली जात आहे. पशुपालकामध्ये मोठ्या प्रमाणात लोकप्रिय असल्यामुळे, सुपर नेपिअर लागवडीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना चांगले उत्पादन मिळणे शक्य आहे. काही ठिकाणी जवळ-जवळ सात ते आठ एकर जमिनीत सुपर नेपियर लागवडीच्या माध्यमातून शेतकरी लाखो रुपये प्रति महिन्याला कमवत आहेत. विशेष म्हणजे कमी पाण्यात येणारे हे चारा पीक असून, दुष्काळग्रस्त पट्ट्यात देखील याची लागवड केली जाऊ शकते.

वर्षभर मिळतो मुबलक चारा :पशुखाद्य म्हणून याचा खूप उपयोग होतो. सुपर नेपियर गवताचे उत्पादन हे वर्षभर सुरु राहत असल्यामुळे डेअरी उत्पादक शेतकऱ्यांना जनावरांसाठी हिरवा चारा वर्षभर उपलब्ध होतो. सुपर नेपियर गवत एकदा लागवड केल्यानंतर सात ते आठ वर्ष यापासून उत्पादन मिळत राहते. यामध्ये क्रमाक्रमाने त्याची कापणी केली जाते व दुसर्या बाजूने शेतात एक कलम टाकल्यानंतर दुसरे कलम तयार होत असते. सुपर नेपियर गवत १५ फूट उंच वाढते व यापासून चांगल्या प्रतीचा हिरवा आणि सुका चारा देखील मिळतो.सुपर नेपियर गवताला खर्च कमी असून मात्र त्या तुलनेत उत्पादन जास्त मिळते.

# शेतमालाचे नुकसान टाळा; पॅक हाऊस उभारणीसाठी मिळणार लाखोंचे अनुदान

मुंबई फळे व भाजीपाल्याची काढणीनंतर योग्य साठवणूक आणि पॅकिंगची सुविधा नसल्यामुळे मोठ्या प्रमाणात शेतमालाची नासाडी होते. ही समस्या दूर करण्यासाठी शासनाच्या एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान योजनेअंतर्गत शेतकऱ्यांसाठी पॅक हाऊस उभारण्याची योजना राबवली जात आहे.

या योजनेत कृषी विभागामार्फत ५० टक्के अनुदान देण्यात येत असून शेतकऱ्यांना तब्बल २ लाख ४० हजार रुपयांची आर्थिक मदत मिळत आहे. पॅक हाऊसच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मालाची वर्गवारी, पॅकिंग आणि साठवणूक व्यवस्थित करता येते. त्यामुळे मालाची गुणवत्ता टिकून राहते आणि बाजारात चांगला दर मिळण्याची शक्यता वाढते. परिणामी, फळबाग आणि भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांसाठी ही योजना आर्थिकदृष्ट्या फायदेशीर ठरत असल्याचे कृषी विभागाचे म्हणणे आहे.

अर्धा खर्च शासनाकडून : फळबाग आणि भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांना काढणीनंतर मालाची निवड, साठवणूक व पॅकिंग करता यावे यासाठी २० फूट रुंद व ३० फूट लांबीचे पॅक हाऊस उभारण्याची योजना आहे. या स्ट्रक्चरचा अंदाजित खर्च सुमारे ४ लाख ८० हजार रुपये आहे. त्यापैकी ५० टक्के म्हणजे २ लाख ४० हजार रुपये शासनाकडून अनुदान म्हणून दिले जातात. यामुळे शेतकऱ्यांना शेतमालाची हाताळणी आणि पॅकिंगची सोय शेतातच उपलब्ध होत असून नासाडी टाळण्यास मदत होत आहे.

केवळ शेड नव्हे, तर प्रक्रिया केंद्र : पॅक हाऊस ही केवळ शेड नसून शेतमालाच्या प्राथमिक प्रक्रियेसाठीचे एक छोटे केंद्रच मानले जाते. या संरचनेमध्ये जमिनीपासून सुमारे २ फूट भराव टाकून त्यावर ४ फुटांची भिंत उभारली जाते. त्यावर लोखंडी अँगलच्या साहाय्याने ६ फूट उंच जाळी बसवून सुरक्षितता केली जाते. छतावर पत्रे टाकून मजबूत शेड तयार केले जाते.

पॅक हाऊसमध्ये असलेल्या सुविधा : मालाचे वजन करण्यासाठी वजन काटा, मालाची ने-आण करण्यासाठी छोटी ट्रॉली, तसेच पॅकिंगसाठी विशेष ओटा. अशा सुविधांचा समावेश असतो. त्यामुळे मालाची वर्गवारी, पॅकिंग आणि साठवणूक एकाच ठिकाणी करता येते.



# भेंडीवर फळ पोखरणाऱ्या अळीचे एकात्मिक नियंत्रण उपाय!



भेंडी पिकावर शेंडे व फळ पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव वाढतांना दिसत आहे. या किडीमुळे पिकाचे ४० टक्केपर्यंत नुकसान होऊ शकते. शेतकरी बांधवांनी योग्य वेळी कीड नियंत्रणाच्या एकात्मिक पद्धतीचा अवलंब केल्यास हे नुकसान टाळता येणार आहे.

फळ पोखरणाऱ्या अळीमुळे होणारे नुकसान : वर्षभर कार्यक्षम असणाऱ्या या किडीला जास्त आर्द्र व उष्ण तापमान पोषक ठरते. या किडीची अळी अंड्यातून बाहेर निघाल्यानंतर कोवळ्या शेंड्याना पोखरून आत जाते. प्रादुर्भावग्रस्त पोंगा मलूल होऊन खालच्या दिशेने लोंबतो व नंतर वाळतो. अळीने पोखरलेल्या कळ्या व फुले वाळून खाली पडतात. फळावर अळीने केलेले छिद्र आणि तिची विष्ठा दिसते, तर प्रादुर्भावग्रस्त फळे विकृत आकाराची होतात. फळांची वाढ होत नाही. अशी फळे विक्री योग्य राहत नाहीत.

एकात्मिक नियंत्रण : कीडग्रस्त फळे तोडून अळीसह नष्ट करावे. अळीच्या सर्वेक्षणासाठी ५ कामगंध सापळे प्रति हेक्टरी लावावेत. तसेच एकरी १० पक्षी थांबे लावावेत. सुरूवातीच्या अवस्थेत रासायनिक कीटकनाशकाऐवजी ढालकिडा, क्रायसोपा, सिरफिड माशी, भक्षक ढेकूण या मित्र कीटकांमार्फत अळीचे नियंत्रण करावे. ५ टक्के निंबोळी अर्क किंवा ॲझाडिरेक्टीन (३०० पीपीएम) ५ मिलि प्रति लिटर पाण्यातून प्रतिबंधात्मक फवारणी करावी. सध्या वातावरणात आर्द्रता असल्यामुळे बिव्हेरिया बॅसियाना (१ टक्के डब्ल्यूपी) १० ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणे फवारणी केल्यास शेंडा व फळ पोखरणाऱ्या अळीचे प्रभावी व्यवस्थापन होईल. एचएएनपीव्ही (२५० एलई) या विषाणूजन्य कीटकनाशकाची ०.५ मिलि प्रति लिटर पाणी या प्रमाणे सायंकाळी फवारणी करावी. रासायनिक कीटकनाशकाची फवारणी फक्त किडींनी आर्थिक नुकसानीची पातळी ओलांडल्यानंतर खालीलप्रमाणे फवारणी करावी. शेंडा व फळ पोखरणाऱ्या अळीसाठी इमामेक्टीन बेन्झोएट (५ एसजी) ०.२७ ग्रॅम किंवा लॅबडा सायहॅलोथ्रीन (५ ईसी) ०.६ मिलि मिली प्रति लिटर पाणी फवारणी करावी.


# बीट लागवड तंत्रज्ञान

सॅलेड, सरबत, कोशिंबीर, चटणी, रक्त वाढीसाठी याची चांगले मदत होते. भारतात पंजाब, कर्नाटक, तमिळनाडू, राजस्थान, पश्चिम बंगाल व महाराष्ट्र या राज्यांमध्ये या पिकाची लागवड केली जाते. बाजारात याची चांगले मागणी आहे.

जमिनीचा प्रकार : बिटच्या लागवडीसाठी भुसभुशीत, पाण्याचा निचरा होणारी जमीन योग्य असते. तसेच भारी जमिनीत बीटाची लागवड केल्यास बीटाच्या मुळाचा आकार वाकडा होतो. या साठी जमिनीचा सामू हा ६ ते ७.५ असावा. तसेच ९ते १० सामू असणाऱ्या क्षारयुक्त जमिनीत बीटाची वाढ चांगले होते तसेच बीट ची महाराष्ट्रात खरीप हंगामात लागवड केली जाते.

हवामान : बिट हें थंड हवामानातील पीक असून या काळातील हवामान पोषक असते बीटची रब्बी हंगामात ऑक्टोबर मध्ये बी पेरणी केली जाते परंतु महाराष्टामध्ये जून व जुलै मध्ये बियांची पेरणी केली जाते.

पिकाची जात : डेट्राईट डार्क रेड, क्रीम्सन ग्लोब, अर्ली वंडर लागवड : एक हेक्टर साठी ७ ते १० किलो बियाणे लागते.बियाणां ची लागवड पेरून किंवा टोकण पद्धतीने करावी. एका ठिकाणी २ बिया टोकून लागवड करावी बीटासाठी ४५ सेमी अंतरावर सरीवर करावी आणि सरी वरंबा १५ ते २० से मीटर अंतरावर बियाणे लागवड करावी. बियाणे उगवून आले की विरळणी करून एका ठिकाणी १ च रोप ठेवावे. तसेच बी लागवड करण्या पूर्वी बियाणे रात्रभर भिजत ठेवावे म्हणजे बियाणे चांगले उगवते. बियाणे जमिनीत लागवड



करण्यापूर्वी जमिनीत ओलावा असावा, बीट ची लागवड ३०-४५ बाय १५ ते २० सेमीटर अंतरावर वर करावी.

खत व्यवस्थापन: लागवडीच्या वेळी १५ ते २० गाड्या शेणखत टाकावे ६० ते ७० किलो नत्र,१०० ते १२० किलो स्फुरद आणि ६० ते ७० किलो पालाश हेक्टरी दयावे. नत्राची अर्धी मात्रा व स्फुरद आणि पालाशची पूर्ण मात्रा बियांची लागवड करताना दयावी व नत्राची उरलेली अर्धी मात्रा ही पेरणी नंतर ४ ते ६ आठवडयांनी द्यावी.

पाणी व्यवस्थापन : कंदाच्या चांगल्या वाढीसाठी पिकाला पाण्याचा भरपूर पुरवठा करावा.जमिनीत सतत ओलावा राहील याची काळजी घ्यावी. त्यामुळे उगवण चांगली होऊन पिकांची वाढ चांगली होते. पिक वाढीच्या काळात पाण्याची कमतरता पडू देऊ नये. रब्बी हंगामात पिकाला ८-१० दिवसांच्या अंतराने नियमित पाणी द्यावे.

रोग नियंत्रण : १) मावा - पानातील रस शोषण करतो त्यामुळे वेली निस्तेज होते पिकाची वाढ खुंटते. उपाय - टाटा माणिक - ८ ते १० ग्राम १५ लिटर च्या पंप ला घेऊन फवारणी करावी. अथवा निमार्क २५- ३० ग्राम १५ लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. २) तुडतुडे - पानातील रस शोषण करते. उपाय - अरेवा ८ ते १० ग्राम १५ लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी अथवा निमार्क २५ -३० ग्राम १५ लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.३) सफेद माशी - :पानातील रस शोषण करते. उपाय- उलाला ८ ते १० ग्राम १५ लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. ४) पाने खाणारी अळी व फळातील अळी - पाने खाते व फळाच्या आत मध्ये अळी तयार होते त्यामुळे फळ वाकडे होते. उपाय - निमार्क २५ -३० ग्राम १५ लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी व किडलेली फळे काढून टाकावी नंतर फवारणी करावी. ५) मर रोग - पाणी अतिजास्त दिलेल्या मुळे किंवा वातावरणातील बदलामुळे रोपाची मर होते. उपाय - पिकाच्या आवश्यक्ते नुसार पाणी दयावे तसेच रोपाच्या बुडा जवळ बुरशीनाशका चे ड्रिंचिंगी करावे किंवा फवारणी करणे.

उत्पादन बिटाची काढणी : ७० ते ७५ दिवसांनी काढणी करावी. बीटच्या कंदाची वाढ ३ ते ५ से मी झाली की हाताने उपटून करावी तसेच काढणी करताना मुळ्यांना इजा होणार नाही याची काळजी घ्यावी. काढणी नंतर कंदाची प्रतवारी करावी तसेच कंद विक्रीला पाठवताना त्याची पाने काढून टाकावी व कंद स्वछ धुणे. पॅकिंग हें प्लास्टिक च्या पिशवीत केल्यास कंद जास्त काळ चांगले राहतात. तर ४ ते ६ जुड्या बांधून विक्रीस पाठवले जातात. याचे सरासरी उत्पादन हेक्टरी २० ते २५ टन इतके मिळते.



राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत



# अंबडमध्ये पुरवठा विभागाची धडक कारवाई

## ९ घरगुती गॅस सिलिंडर जप्त; ३ पेट्रोल पंपांचीही आकस्मिक तपासणी

अंबड । प्रतिनिधी

जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यात अवैध गॅस वापर आणि इंधन साठेबाजीला आळा घालण्यासाठी पुरवठा विभागाने ११ मार्च २०२६ रोजी मोठी मोहीम राबवत धडक कारवाई केली. या कारवाईदरम्यान व्यावसायिक कारणांसाठी वापरले जात असलेले ०९ घरगुती गॅस सिलिंडर जप्त करण्यात आले. तसेच तालुक्यातील ३ पेट्रोल पंपांचीही आकस्मिक तपासणी करून इंधन साठा आणि नोंदींची पडताळणी करण्यात आली.

जिल्हा पुरवठा अधिकारी श्रीमती सविता चोधर, तहसीलदार विजय चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अंबडचे पुरवठा निरीक्षक किरणकुमार खांडेभराड यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली. या पथकाने शहरातील विविध हॉटेल्स, रेस्टॉरंट्स आणि इतर व्यावसायिक प्रतिष्ठानांवर अचानक धाडी टाकून तपासणी केली. तपासणीदरम्यान अनेक ठिकाणी स्वस्त दरातील घरगुती गॅस सिलिंडरचा वापर व्यावसायिक कारणांसाठी होत असल्याचे उघडकीस आले. पुरवठा विभागाच्या पथकाने तत्काळ कारवाई करत ०९ घरगुती सिलिंडर



जप्त केले. जप्त करण्यात आलेल्या सिलिंडरचा पंचनामा करून त्यांना जीवनावश्यक वस्तू कायदा अंतर्गत ताब्यात घेण्यात आले. पुढील कारवाईचा भाग म्हणून हे सिलिंडर संबंधित अधिकृत गॅस एजन्सीकडे सुपूर्द करण्यात आले असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या संबंधित व्यावसायिकांविरुद्ध कायदेशीर गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली. दरम्यान, गॅस सिलिंडरवरील कारवाईसोबतच पुरवठा विभागाने तालुक्यातील ३ पेट्रोल पंपांचीही कसून तपासणी केली. या तपासणीदरम्यान पेट्रोल व डिझेलचा उपलब्ध साठा, विक्रीची नोंद, साठा नोंदवही (स्टॉक रजिस्टर) आणि व्यवहारांची पारदर्शकता यांची पडताळणी करण्यात आली.

काही ठिकाणी नोंदी अद्ययावत ठेवण्याबाबत त्रुटी आढळल्याने संबंधित पेट्रोल पंप चालकांना नोंदी व्यवस्थित ठेवण्याच्या तसेच नियमांचे काटेकोर पालन करण्याच्या कडक सूचना देण्यात आल्या. पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, सध्याच्या जागतिक परिस्थितीमुळे इंधन पुरवठ्यावर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे घरगुती वापरासाठी दिल्या जाणाऱ्या गॅस सिलिंडरचा व्यावसायिक कारणांसाठी वापर करणे हा गंभीर गुन्हा असून, यामुळे सामान्य ग्राहकांना गॅसचा तुटवडा भासू शकतो. घरगुती गॅस सिलिंडरचा अवैध वापर करणाऱ्यांविरुद्ध पुढील काळातही अशाच प्रकारच्या कारवाया सातत्याने केल्या जातील. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाईसोबतच फौजदारी गुन्हाही दाखल होऊ शकतो. त्यामुळे व्यावसायिकांनी केवळ व्यावसायिक गॅस सिलिंडरचाच वापर करावा, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे. पुरवठा विभागाच्या या धडक कारवाईमुळे तालुक्यातील व्यावसायिकांमध्ये खळबळ उडाली असून, अवैध गॅस वापरावर प्रशासनाने अधिक कडक भूमिका घेतल्याचे स्पष्ट झाले आहे.

# श्रमलेल्या शेतकऱ्यांची, कष्टकऱ्यांची नाथभक्तांची यात्रा म्हणजे नाथषष्ठी

पाथर्डी । प्रतिनिधी

मार्च एप्रिल महिना सुरू होताच जसे जसे उन्हाचे तीव्र चटके बसायला लागतात तशा तशा गावच्या यात्रा सुरू होतात पाथर्डी तालुक्यात गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर अनेक यात्रांचा सूर्योदय होतो महाराष्ट्रात भटक्यांची यात्रा म्हणून प्रसिद्ध असलेली मढी यात्रा तसेच साल सिद्धबाबा देवस्थान मिडसांगवी यात्रा आणि श्रमलेल्या शेतकऱ्यांच्या कष्टकऱ्यांच्या व नाथभक्तांच्या परंपरेतील पैठण येथील एकनाथषष्ठी या यात्रा प्रसिद्ध आहेत श्री क्षेत्र मढी या यात्रेचे वैशिष्ट्य म्हणजे येथे गाढवांचा बाजार भरला जातो व नाथांचे दर्शन घेऊन भाविक भक्त नाथचरणी लीन होतात मिडसांगवी येथील सालसिद्ध बाबा देवस्थान येथील नागनाथाची यात्रा प्रसिद्ध आहे.

महाराष्ट्रातील सर्व सालसिद्ध देवस्थानचे शक्तीपीठ म्हणून मिडसांगवीची यात्रा ओळखली जाते वारकऱ्यांच्या आणि नाथभक्तांच्या परंपरेतील संत एकनाथ महाराजांच्या पुण्यभूमीतील पैठण येथे भरणारी नाथषष्ठी यात्रा ही श्रमलेल्या शेतकऱ्यांच्या कष्टकऱ्यांच्या गरिबांच्या रहाड यात्रा असते महाराष्ट्रातील सर्व संतविभूती संत एकनाथ महाराजांचे दर्शन



घेण्यासाठी पायी दिंडी दिंड्या पताका घेऊन पैठण येथे नाथषष्ठीला येतात गोदावरी मातेचे स्नान संध्या करून व संत एकनाथ महाराजांचे दर्शन घेऊन महाराष्ट्रात गुढ्या उभारल्या जातात अशाप्रकारे महाराष्ट्रात यात्रा परंपरेने ग्रामीण भागातील संस्कृतीचे वलय आजही अबाधित आहे. गुढीपाडव्याच्या पूर्वसंध्येला महाराष्ट्रातील तीर्थक्षेत्र असलेल्या श्री क्षेत्र पैठण येथे संत एकनाथ महाराज यांची नाथषष्ठी असलेल्या प्रसिद्ध षष्ठी यात्रेत रंगीबेरंगी रंगांचे धुळवड रंग विक्री करण्यासाठी ग्रामीण भागातील शेतकरी कष्टकरी आजही ग्रामीण यात्रेचे सांस्कृती टिकून ठेवत आहेत.

# गडकोट विकास महामंडळासाठी धाराशिवला आत्मदहनाचा प्रयत्न

धाराशिव । प्रतिनिधी

स्वराज्यकालीन गडकिल्ल्यांचे जतन, संवर्धन व विकासासाठी स्वतंत्र गडकोट विकास महामंडळाची स्थापना करण्याच्या मागणीसाठी जागर प्रतिष्ठानच्या वतीने राज्यभर आंदोलन उभारण्यात आले आहे. या मागणीच्या समर्थनार्थ महाराष्ट्रातील तब्बल १२० तालुक्यांतील तहसील कार्यालयांना निवेदन देण्यात आले आहे. तर याच मुद्द्यावरून एका कार्यकर्त्याने अंगावर पेट्रोल ओतून घेत धाराशिव येथील जिल्हाधिकारी कार्यालयात आत्मदहनाचा प्रयत्न केला.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याचा इतिहास सांगणारे गडकिल्ले, मावळ्यांच्या समाधीस्थळांसह विविध ऐतिहासिक स्थळांचे जतन व विकास व्हावा यासाठी स्वतंत्र गडकोट विकास महामंडळाची स्थापना आवश्यक असल्याची भूमिका जागर प्रतिष्ठानने मांडली आहे. या मागणीसाठी जागर प्रतिष्ठानचे अध्यक्ष किसन पाटील चव्हाण यांनी तुळजापूर येथील तहसील कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू केले होते.

दि. ११ मार्च रोजी उपोषणाचा सातवा दिवस पूर्ण झाला. त्यांच्या प्रकृतीची काळजी घेण्यासाठी उपजिल्हा रुग्णालय तुळजापूर येथील डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार नियमित आरोग्य तपासणी करण्यात येत होती. मात्र सात दिवस उलटूनही शासनाकडून कोणतीही ठोस दखल घेण्यात आलेली नसल्याने आंदोलन आणखी तीव्र करण्यात आले. तुळजापूरातील या आंदोलनाकडे प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप करीत काही कार्यकर्ते कार्यकर्ते जिल्हाधिकारी कार्यालयात आले. त्यांनी जिल्हाधिकारी बैठक घेत असलेल्या सभागृहात घोषणा देण्याचा प्रयत्न केला.

तेथून त्यांना जिल्हाधिकाऱ्यांनी सुनावले. त्यानंतर संतप्त झालेल्या विशाल जाधव या कार्यकर्त्याने जिल्हाधिकाऱ्यांच्या पहिल्या मजल्यावरील दालनाबाहेर (पोर्चमध्ये) अंगावर पेट्रोल ओतून घेतले. त्यानंतर त्याने काडेपेटी काढून काडी पेटवण्याचा प्रयत्न केला.

मात्र सुदैवाने ती विझली. त्यानंतर उपस्थित पत्रकार व सुरक्षा कर्मचाऱ्यांनी धावपळ करून त्याला रोखले. नंतर पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. उपस्थितांनी प्रसंगावधान दाखवले नसते तर येथे अनुचित प्रकार घडला असता, अशी चर्चा परिसरात होत आहे.

# प्रेस सेवा पोर्टल वर वृत्तपत्रांची छापील प्रत अपलोड करणे बंधनकारक

## डिजिटल पीडीएफ पत्रकांना बसणार चाप

पुणे । प्रतिनिधी

भारत सरकारच्या माहिती आणि प्रसारण मंत्रालयांतर्गत असलेल्या प्रेस रजिस्ट्रार जनरल ऑफ इंडिया कार्यालयाने नियतकालिकांच्या प्रकाशकांसाठी एक महत्त्वाची मार्गदर्शक सूचना जारी केली आहे. 'प्रेस आणि नियतकालिक नोंदणी नियम, २०२४' च्या नियम १० नुसार, आता प्रत्येक प्रकाशकाला आपल्या अंकाची छापील प्रत जमा करणे बंधनकारक करण्यात आले आहे. या नियमामुळे केवळ पीडीएफ स्वरूपात बातमी पत्र सोशल मीडियावर फिरणाऱ्या अनधिकृत वृत्तपत्रांना लगाम बसणार आहे. प्रत्येक प्रकाशकाने आपल्या वृत्तपत्राच्या किंवा नियतकालिकाच्या प्रत्येक अंकाची छापील प्रत प्रसिद्ध झाल्यापासून ४८ तासांच्या आत 'प्रेस सेवा पोर्टल'वर अपलोड करणे आवश्यक आहे. संपूर्ण अंक किंवा सर्व पाने अपलोड करण्याची गरज नाही. प्रकाशकांनी केवळ त्यांच्या छापील अंकाचे पहिले पान (ज्यावर मास्टहेड आणि दिनांक स्पष्ट दिसेल) अपलोड करायचे आहे. डिजिटल प्रत ही छापील अंकाची स्कॅन केलेली प्रतिमा असावी. यासाठी , , भौतिक किंवा (इमेज फॉरमॅट) या फॉरमॅटचा वापर करता येईल. डिजिटल अपलोड व्यतिरिक्त, महिन्यातील सर्व अंकांच्या छापील प्रती दर महिन्याच्या ५ तारखेपर्यंत संबंधित राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशातील 'प्रेस इन्फॉर्मेशन ब्युरो' च्या कार्यालयात जमा कराव्या लागतील.

कायदा, २०२३ अंतर्गत नोंदणीकृत असलेली सर्व नियतकालिके त्यांच्या अर्जानुसार आणि प्रतिज्ञापत्रानुसार नियमितपणे छापली आणि प्रसिद्ध केली जात आहेत की नाही, याची खातरजमा करण्यासाठी सरकारने हा निर्णय घेतला आहे. नियम १० चे उल्लंघन टाळण्यासाठी आणि नोंदणी वैध ठेवण्यासाठी सर्व प्रकाशकांनी या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन डेप्युटी प्रेस रजिस्ट्रार जनरल रजित चंद्रन एम.आर. यांनी केले आहे. 'प्रेस आणि नियतकालिक नोंदणी नियम, २०२४' मधील नव्या तरतुदींमुळे आता वृत्तपत्र क्षेत्रात मोठे बदल होणार आहेत. नवीन नियमांनुसार, प्रत्येक प्रकाशकाला आपल्या अंकाची प्रत्यक्ष छापील प्रत डिजिटल पीआरजीआय पोर्टलवर अपलोड करणे आणि पीआयबी कार्यालयात जमा करणे आता बंधनकारक करण्यात आले आहे. या निर्णयामुळे केवळ पीडीएफ स्वरूपात सोशल मीडियावर फिरणाऱ्या अनधिकृत वृत्तपत्रांना लगाम बसणार आहे. सध्या अनेक ठिकाणी केवळ डिजिटल पत्रके किंवा पीडीएफ तयार करून ती सोशल मीडियावर वृत्तपत्र म्हणून पसरवली जातात. यामुळे खऱ्या अर्थाने मुद्रित होणाऱ्या वृत्तपत्रांच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत होते. आता पीआरजीआय नियम कडक लागू झाल्यामुळे, जे प्रत्यक्षात छापले जाते, त्याचीच नोंद अधिकृत मानली जाईल. जे पत्रकार किंवा प्रकाशक केवळ सोशल मीडिया पुरती डिजिटल पत्रके काढून स्वतःला वृत्तपत्र संपादक म्हणवून घेतात, त्यांच्यावर या नियमामुळे आता मर्यादा येणार आहेत. 'प्रेस सेवा पोर्टल'वरील या नोंदीमुळे वृत्तपत्र क्षेत्रातील पारदर्शकता वाढण्यास मदत होणार आहे.

# हिंगोली जिल्ह्यात गॅस सिलिंडरचा पुरेसा साठा-जिल्हाधिकारी

हिंगोली । प्रतिनिधी

अमेरिका-इराण यांच्यात युद्ध सुरू असले तरीही जिल्ह्यात पुरेसा गॅस सिलिंडरचा साठा असून, नागरिकांनी घाबरून जावू नये, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी जिल्हावासीयांना केले आहे. जिल्ह्यातील गॅस पुरवठा स्थिती सध्या पूर्णपणे सामान्य असून नागरिकांनी घाबरून जाण्याची कोणतीही गरज नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

जिल्ह्यात एकूण १३ गॅस एजन्सी कार्यरत असून एकूण ३,७४,४७८ ग्राहकांना गॅस पुरवठा केला जात आहे. सध्या ४,४३५ घरगुती गॅस सिलिंडर उपलब्ध आहेत. व्यावसायिक गॅस सिलिंडरचा पुरवठा करताना रुग्णालये, वसतिगृहे तसेच इतर शासकीय संस्थांना प्राधान्य दिले जात आहे. तसेच गॅस प्लांटमध्ये घरगुती सिलिंडरचा सुमारे ३ दिवसांचा बफर साठा उपलब्ध आहे. वितरकांकडेही सुमारे दीड दिवसांचा गॅस साठा उपलब्ध असल्याने पुरवठा सुरळीत सुरू आहे. सध्याची परिस्थिती पूर्णपणे सामान्य असून नागरिकांनी घाबरून न जाता नियमितपणे गॅसचा वापर करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले आहे.

# पोलिसांचा वाळूमाफियांना चाप

## कुंजखेडा शिवारात विनापरवाना वाहतूक करणाऱ्या दोन आयशर वाहनांवर कारवाई

संभाजीजगर । प्रतिनिधी

कन्नड तालुक्यातील कुंजखेडा शिवारात विनापरवाना शासकीय गौण खनिज वाळूची वाहतूक करणाऱ्या दोन आयशर वाहनांवर कन्नड ग्रामीण पोलिसांनी कारवाई करत अंदाजे ५१ लाख ७० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपीस तीन दिवसांची पोलिस कोठडी देण्यात आली आहे.

पोलिस हेडकॉन्स्टेबल धीरज चव्हाण यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, हतनूरचे बिट जमादार कैलास करवंदे यांना माहिती मिळाली की कुंजखेडा मदरसा ते दाभाडी रस्त्यावरून दोन आयशर वाहनांमधून शासकीय गौण खनिज वाळूची बेकायदेशीर वाहतूक सुरू आहे. त्यानुसार सहाय्यक पोलिस निरीक्षक डॉ. रामचंद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस पथकाने घटनास्थळी सापळा रचला. यावेळी आयशर वाहन क्रमांक ( एमएच-१९ सीएक्स ७२१९) या वाहनावर दुसरी नंबर प्लेट (एमएच २० जीसी ९१४७) लावलेली आढळून आली. तर दुसरे आयशर वाहनही त्याच मार्गाने येताना



पोलिसांच्या ताब्यात घेण्यात आले. दोन्ही वाहनांमध्ये प्रत्येकी पाच ब्रास वाळू भरलेली असल्याचे निदर्शनास आले. वाहनमालक व चालक मुक्तार शब्बीर पठाण (रा. कुंजखेडा) तसेच दुसरा चालक (नाव अज्ञात) यांच्याविरुद्ध ग्रामीण पोलिस ठाण्यात रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोहेकॉ कैलास करवंदे करत असून गुन्हयातील आरोपी मुस्ताक शब्बीर पठाण यास तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनविण्यात आली आहे. या कारवाईत सहाय्यक पोलिस निरीक्षक डॉ. रामचंद्र पवार, बिट जमादार कैलास करवंदे, पोहेकॉ धीरज चव्हाण व इतर पोलिस कर्मचाऱ्यांचा सहभाग होता.

# शिक्षकानेच केला विद्यार्थिनीचा विनयभंग

संभाजीनगर । प्रतिनिधी

पैठण तालुक्यातील ढाकेफळ येथे एका शिक्षकाने अल्पवयीन विद्यार्थिनीचा विनयभंग केल्याची घटना घडली. पीडित विद्यार्थिनीच्या आईने एमआयडीसी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. या तक्रारीनंतर शिक्षक संभाजी शिंदे याच्याविरुध्द गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

ढाकेफळ येथील एका १३ वर्षीय अल्पवयीन विद्यार्थीनीचा विनयभंग केल्याची घटना २६ फेब्रुवारी रोजी घडली होती. घटना घडल्यापासून विद्यार्थिनी घरामध्ये कोणाला काही एक बोलत नव्हती. मुलगी नेहमी घाबरलेली दिसत असल्याचे लक्षात आल्यानंतर तिच्या आईने विचारणा केल्यावर तिने याबाबत आईला सांगितले. शिक्षक संभाजी शिंदे याने एकेदिवशी आईस्क्रीमचे आमिष दाखवत तिचा विनयभंग केला. या घटनेबद्दल कोणाला सांगू नको, असे म्हणत आईस्क्रीम व गिफ्ट देण्याचे आमिष दाखवले, असे मुलीने सांगितले. या प्रकारामुळे पीडित विद्यार्थिनीच्या आईने एमआयडीसी पोलिस ठाण्याचे सपोनि ईश्वर जगदाळे यांच्याकडे दाखल केली. या शिक्षकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक कविता जगताप करीत आहे.


## जाहीर प्रगटन

**मा. श्री एम. ए. शिंदे, दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड यांच्या न्यायालयात.**

**किरकोळ दिवाणी अर्ज १०३/२०२६**
**शहाबाई व इतर विरुध्द निरंक**
**मार्फत : ॲड. एस. आर. नागरगोजे**

अर्जदार :- १. शहाबाई भ्र. शामराव उर्फ शामा मिसाळ, वय ७० वर्षे, धंदा घरकाम, २. हरिदास पि. शामराव उर्फ शामा मिसाळ, वय ५१ वर्षे, धंदा शेती, ३. रामदास पि. शामराव उर्फ शामा मिसाळ, वय ४५ वर्षे, धंदा शेती, ४. देविदास पि. शामराव उर्फ शामा मिसाळ, वय ४० वर्षे, धंदा शेती, ५. लक्ष्मण पि. शामराव उर्फ शामा मिसाळ, वय ३५ वर्षे, धंदा शेती, वरील सर्व रा. निवडुंगा ता. पाटोदा जि. बीड.

विरूध्द निरंक

मागणी अर्ज:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. वरील अर्जदार क्र. १ ते ५ यांनी या न्यायालयात मयत शामराव उर्फ शामा पि. देवराव मिसाळ यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी शामराव उर्फ शामा पि. देवराव मिसाळ यांचा मृत्यु दिनांक १३/०४/२०२१ रोजी निवडुंगा ता. पाटोदा, जि. बीड येथे झाला असुन अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क्र. २ ते ५ हे मयताचे मुले आहेत. वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरह मयताचे वारस नव्हेत अथवा त्यांच्या व्यतिरीक्त इतर कोणी मयताचे वारस आहेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरह अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत शामराव उर्फ शामा पि. देवराव मिसाळ यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १२ मार्च २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ०४ मे २०२६.

स्वाक्षरित
क. लिपीक

आदेशावरुन
स्वाक्षरित
**सहाय्यक अधिक्षक,**
दिवाणी न्यायालय, क. स्तर, पाटोदा. ता. पाटोदा, जि. बीड.



जाहिर प्रगटन

## तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**दुरध्वनी क्रमांक : ०२-४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-१६०७**
**दिनांक - २९/१२/२०२५**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती बागवान रऊफमिया बाबुलाल रा. सुखापुरी ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वतः जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| १ | बागवान रऊफमिया बाबुलाल | स्वतः | १७/१०/१९८० |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**



जाहिर प्रगटन

## तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**दुरध्वनी क्रमांक : ०२-४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-८५५**
**दिनांक - २४/०९/२०२५**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती बंडु बन्सी राठोड रा. गारवारडी तांडा,बावनेपारंगी ता. बदनापुर जि. जालना यांनी यांच्या मुलगी जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| १ | राजश्री बंडू जाधव | मुलगी | २३/०२/२०२१ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे. **स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**


# बिबट्याच्या हल्ल्यात बोकड, बकरी ठार

संभाजीनगर । प्रतिनिधी

कन्नड तालुक्यातील चिकलठाण परिसरात बिबट्याने केलेल्या हल्ल्यात एक बोकड व एक बकरी ठार झाली असून, कुत्रा गंभीर जखमी झाला. ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. चिकलठाण येथील शेतकरी उत्तम साहेबराव चव्हाण यांच्या गट क्रमांक ३५२ मधील शेतात मंगळवारी मध्यरात्री सुमारे साडेबारा वाजण्याच्या सुमारास बिबट्याने हल्ला चढवला.

या हल्ल्यात एक बोकड व एक बकरी ठार झाली असून घराजवळील कुत्रा गंभीर जखमी झाला आहे. अचानक झालेल्या या प्रकारामुळे परिसरातील शेतकरी व नागरिकांमध्ये घबराट पसरली आहे. घटनेची माहिती मिळताच वन विभागाच्या पथकाने तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. वनपरिमंडळ अधिकारी ए. जी. वाघ, वनरक्षक एस. बी. वाघ तसेच पशुवैद्यकीय अधिकारी बनकर यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली व पंचनामा केला. या वेळी उबाठा विभागप्रमुख कल्याण चव्हाण, दीपक चव्हाण, ज्ञानेश्वर चव्हाण, अनिल दळे, प्रवीण क्षीरसागर, बाबासाहेब चव्हाण, भागिनाथ मगर, योगेश्वर चव्हाण, संतोष चव्हाण आदी ग्रामस्थ उपस्थित होते. दरम्यान, चिकलठाण परिसरात बिबट्याचा वावर वाढल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरणआहे. वन विभागाने तातडीने उपाययोजना करून बिबट्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

# फार्मर आयडीमधील तांत्रिक त्रुटी महिनाभरात दुरुस्त होणार

## आ.विजयसिंह पंडित यांच्या लक्षवेधी सूचनेला कृषी मंत्र्यांचे उत्तर

मुंबई । प्रतिनिधी

फार्मर आयडी हा शेतकऱ्यांचा एकमेव ओळख क्रमांक असून शासनाच्या विविध योजना व सेवांचा लाभ घेण्यासाठी तो महत्वाचा आहे. फार्मर आयडी ची नोंदणी करताना शेतजमीनीच्या क्षेत्रातील तफावत, गट क्रमांक, नावातील चुका, गावाच्या नावातील बदल यांसह अनेक तांत्रिक त्रुटी झाल्यामुळे हजारो शेतकरी शासन योजनांच्या रास्त लाभापासून वंचित आहेत. वारंवार तक्रारी देऊनही फार्मर आयडी मधील त्रुटींची दुरुस्ती होत नसल्यामुळे बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे गऱ्हाणे आ. विजयसिंह पंडित यांनी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून थेट विधानसभेत मांडले. कृषीमंत्री दत्तामामा भरणे यांनी या प्रकरणी उच्चस्तरीय बैठक घेऊन एक महिन्यात फार्मर आयडी मधील तांत्रिक त्रुटी दुरुस्त करून दिल्या जातील असे आश्वासन दिले आहे. नादुरुस्त फार्मर आयडीमुळे त्रस्त झालेल्या शेतकऱ्यांनी आ. विजयसिंह पंडित यांचे आभार मानले आहेत.

सन २०२३ मध्ये बीड जिल्ह्यात फार्मर रजिस्ट्री पायलट प्रोजेक्ट राबविण्यात आला, पायलट प्रोजेक्ट राबविताना शेतकऱ्यांना देण्यात आलेल्या फार्मर आयडीमध्ये मोठ्या प्रमाणावर तांत्रिक चुका झाल्या, अनेक शेतकऱ्यांचे क्षेत्र १.९९ हेक्टर नोंद झाले परिणामी नादुरुस्त फार्मर आयडीमुळे अनेक शेतकऱ्यांना शासन योजनांच्या रास्त लाभापासून वंचित रहावे लागले. फार्मर आयडी दुरुस्त करणे संदर्भात सर्वाधिक तक्रारी गेवराई विधानसभा मतदार संघातून येत होत्या. आ. विजयसिंह पंडित यांनी याप्रकरणी पुढाकार घेऊन तहसिल आणि जिल्हाधिकारी कार्यालयात बैठका घेतल्या, स्थानिक स्तरावर फार्मर आयडीमधील त्रुटी दूर करण्याची यंत्रणा नसल्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी लेखी पत्राद्वारे राज्याच्या जमाबंदी आयुक्तांकडे या बाबत सविस्तर माहिती दिली. तरीही शेतकऱ्यांना न्याय मिळत नसल्यामुळे आ. विजयसिंह पंडित यांनी हा विषय लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून विधानसभेत उपस्थित केला.



आ. विजयसिंह पंडित यांनी या विषयाची अभ्यासपूर्ण मांडणी करताना शासनाच्या महा डीबीटी वरील सर्व योजना, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी, पिक विमा, नैसर्गिक आपत्तीमधील नुकसान, कर्जमाफी यांसह शासनाच्या ई-सेवासाठी फार्मर आयडीचा उपयोग होत असल्याचे सांगितले. शासन योजनांचा लाभ घेण्यासाठी क्षेत्र मर्यादा २ हेक्टर असल्यामुळे आणि फार्मर आयडीमधील चुकीच्या नोंदीमुळे सुमारे २ लाख ४१ हजार शेतकऱ्यांच्या फार्मर आयडीवर १.९९ हेक्टर क्षेत्राची नोंद झाल्यामुळे हे शेतकरी शासन योजनेच्या लाभापासून वंचित असल्याची बाब त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली. फार्मर आयडी दुरुस्त करण्याची सुविधा तालुकास्तरावर करा, ॲग्री स्टॅक प्रणालीमध्ये नोंदणी झालेल्या शेतकऱ्यांच्या संदर्भाने तक्रारींचा निपटारा लवकर करा, गट नंबर, गाव तालुक्यातील बदल, मोबाईल नंबर दुरुस्त करणे आदी लहान-सहान बदलांबाबतचे अधिकार तलाठी किंवा कृषी सहाय्यक यांना द्या, फार्मर आयडीमधील दोषमुक्त करण्यासाठी विशेष अभियान राबवून तालुकास्तरावर वेगळा संगणक कक्ष उभारा अशी मागणी आ. विजयसिंह पंडित यांनी विधानसभेत केली.शेतकऱ्यांच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा प्रश्न लक्षवेधीच्या माध्यमातून आ. विजयसिंह पंडित यांनी उपस्थित केल्याचे सांगताना राज्याचे कृषीमंत्री दत्तामामा भरणे यांनी याप्रकरणी महिनाभरात बीड जिल्ह्यातील विशेषतः गेवराई विधानसभा मतदार संघातील फार्मर आयडीच्या दुरुस्ती करणार असल्याचे आश्वासित केले. जमाबंदी आयुक्त, ॲग्री स्टॅकचे संचालक, तंत्रज्ञ आणि सेंट्रल प्रोजेक्ट मॉनिटरींग युनिटची टिम यांच्यासोबत आ. विजयसिंह पंडित यांच्या उपस्थित बैठकीचे आयोजन करून सर्व फार्मर आयडी दुरुस्त करून दिले जातील असे त्यांनी सांगितले. बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा आणि जिव्हाळ्याच्या प्रश्नाला सभागृहात वाचा फोडून या बाबत कार्यवाहीचे आश्वासन मिळवून दिल्याबद्दल शेतकऱ्यांनी आ. विजयसिंह पंडित यांचे आभार व्यक्त केले आहे.

# आष्टीत गॅस टंचाई; अहिल्यादेवी गॅस एजन्सीवर नागरिकांची गर्दी

**आष्टी । प्रतिनिधी**

**मध्यपूर्वेतील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर इरान, युनायटेड स्टेट इजराइल यांच्यातील संघर्षामुळे जागतिक ऊर्जा पुरवठ्यावर परिणाम झाल्याचे दिसून येत आहे. त्याचा फटका भारतासह अनेक देशांना बसत असून घरगुती गॅसचा तुटवडा निर्माण होण्याची स्थिती काही ठिकाणी जाणवू लागली आहे.**



याच पार्श्वभूमीवर आष्टी शहरातील खडकत रोडवरील अहिल्यादेवी गॅस एजन्सी येथे आज सकाळपासूनच गॅस टाकी मिळविण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. गॅस टंचाईची चर्चा शहरात पसरल्याने नागरिकांनी आगाऊ सिलिंडर मिळविण्यासाठी एजन्सीकडे धाव घेतली.

घरगुती गॅसची उपलब्धता कमी झाल्याने सर्वसामान्य नागरिकांसोबतच हॉटेल व खाद्य व्यवसायिकांनाही मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनेक हॉटेल चालकांनी गॅस अभावी व्यवसायावर परिणाम होत असल्याची खंत व्यक्त केली.

दरम्यान, टंचाईच्या पार्श्वभूमीवर काही ठिकाणी गॅस सिलिंडरचा काळाबाजार होण्याची शक्यता नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. त्यामुळे प्रशासनाने परिस्थितीवर लक्ष ठेवून योग्य नियोजन करावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

गॅस पुरवठा सुरळीत करण्यासाठी संबंधित विभागाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अन्यथा टंचाई आणखी वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# मुलाच्या हव्यासाला कंटाळून सुनेने जिव दिला

बीड । प्रतिनिधी

आजही समाजात मुलगाच हवा या हट्टापायी महिलांचा छळ होत असल्याचे विदारक वास्तव समोर आलं आहे. बीड तालुक्यातील म्हाळसापूर येथे तीन मुली झाल्याच्या कारणावरून सासरच्या जाचाला कंटाळून एका २८ वर्षीय विवाहितेनं आपलं जीवन संपवलं आहे. भक्ती अमोल कोरडे असं या महिलेचं नाव असून, या प्रकरणी तिच्या पतीसह सासू आणि सासऱ्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भक्ती कोरडे यांचा विवाह काही वर्षांपूर्वी म्हाळसापूर येथील अमोल कोरडे यांच्याशी झाला होता. संसाराच्या सुरुवातीच्या काळानंतर त्यांना तीन मुली झाल्या. मात्र, वंशाला दिवा हवा म्हणजेच मुलगाच हवा, या हट्टापायी सासरच्या मंडळींनी भक्ती यांचा छळ सुरू केला. गेल्या अडीच वर्षांपासून हा मानसिक आणि शारीरिक छळ पराकोटीला पोहोचला होता. मिळालेल्या माहितीनुसार, पतीला दुसरे लग्न करण्यासाठी भक्तीने संमती द्यावी, यासाठी सासरच्या लोकांकडून तिच्यावर वारंवार दबाव टाकला जात होता. इतकेच नाही तर, दुसऱ्या लग्नाला माझी हरकत नाही, असं तिला चक्क बाँड पेपरवर लिहून देण्यासाठी मारहाण करून सक्ती केली जात होती. सततचा अपमान आणि होत असलेल्या मारहाणीमुळे भक्ती प्रचंड तणावाखाली होत्या. या जाचाला कंटाळून अखेर २ फेब्रुवारी २०२६ रोजी भक्ती यांनी आपल्या राहत्या घरी कीटकनाशक प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. विष प्राशन केल्याचं लक्षात येताच त्यांना तातडीने बीड येथील जिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले. प्रकृती खालावल्याने नंतर त्यांना खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. महिनाभर मृत्यूशी झुंज दिल्यानंतर, उपचारादरम्यान त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला.या प्रकरणी भक्ती यांची आई गंगूबाई प्रभू ठोकळ यांनी पिंपळनेर पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. या फिर्यादीवरून पोलिसांनी पती अमोल अर्जुन कोरडे, सासरे अर्जुन साधू कोरडे आणि सासू आशाबाई अर्जुन कोरडे यांच्याविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अर्जुन घोलवाल करत आहेत. एका आईने आपल्या मुलीला गमावल्यानंतर व्यक्त केलेल्या भावनांमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. तीन मुलींच्या डोक्यावरचे आईचे छत्र हरवल्याने परिसरात संताप व्यक्त केला जात आहे. पुढील तपास पिंपळनेर पोलीस करत आहेत.

# गावच्या विकासाला खीळ : मनमानी कारभाराला कंटाळून हाळमच्या उपसरपंचाचा राजीनामा

## सत्ताधाऱ्यांच्या जाचातून गावाला मुक्त करणार -माधव मुंडे

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

लोकप्रतिनिधी म्हणून निवडून येताना गावकऱ्यांना दिलेली आश्वासने पूर्ण होत नसल्याने आणि ग्रामपंचायतीच्या कारभारात होत असलेल्या अनियमिततेवर संताप व्यक्त करत, परळी तालुक्यातील हाळमच्या उपसरपंचाने थेट आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. देवनाथ सुखदेव दहिफळे असे या उपसरपंचाचे नाव असून, त्यांनी आपला राजीनामा गट विकास अधिकाऱ्यांकडे सुपूर्द केला आहे.



परळी तालुक्यातील हाळमचे उपसरपंच देवनाथ सुखदेव दहिफळे यांनी आपल्या राजीनामा पत्रात ग्रामपंचायत प्रशासनावर गंभीर आरोप केले आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून गावात ग्रामसभाच झाली नसल्याचा दावा त्यांनी केला आहे. तसेच ग्रामपंचायत कार्यालय

◀◀ पान ३ वर

# अलिझा इरफान शेखने कडक उन्हात पूर्ण केला रोजा

पाटोदा । प्रतिनिधी

पवित्र रमजान महिन्याला सुरुवात झाली असून, मुस्लिम बांधवांमध्ये उपवास (रोजा) धरण्याची मोठी लगबग पाहायला मिळत आहे. कडक उन्हाळा आणि वाढता उकाडा असतानाही मोठ्या व्यक्तींसोबतच आता लहान मुलांमध्येही रोजा ठेवण्याचा मोठा उत्साह दिसून येत आहे. पाटोदा येथील अवघ्या साडे सहा वर्षांच्या अलिझा इरफान शेख या चिमुरडीने आपला पहिला रोजा यशस्वीपणे पूर्ण करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे.



अलिझा ही पाटोदा येथील प्रियदर्शनी प्राथमिक शाळेत इयत्ता पहिलीमध्ये शिक्षण घेत आहे. सध्या उन्हाचा तडाखा वाढलेला असतानाही, अलिझाने पहाटेपासूनच रोजा धरण्याचा निर्धार केला होता. दिवसभर तहान-भूक विसरून तिने अत्यंत

◀◀ पान ३ वर

# पाटोद्यात कृत्रिम टंचाई निर्माण करून सिलिंडरचा काळाबाजार!

पाटोदा । प्रतिनिधी

गेल्या काही दिवसांपासून आंतरराष्ट्रीय स्तरावर सुरू असलेल्या इराण-इस्रायल युद्धाचा आधार घेत पाटोदा शहरातील काही गॅस एजन्सी चालकांनी सर्वसामान्य जनतेची लूट सुरू केली आहे. गॅसचा मुबलक साठा उपलब्ध असतानाही केवळ अधिक नफा कमवण्यासाठी कृत्रिम टंचाई ( ) निर्माण केली जात असून, घरगुती वापराचे सिलेंडर चढ्या दराने हॉटेल व्यावसायिकांना पुरवले जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

युद्ध केवळ निमित्त, लूट मात्र प्रत्यक्ष

जगभरात युद्धाची परिस्थिती असली तरी भारतात घरगुती गॅसचा पुरवठा विस्कळीत झालेला नाही. मात्र, पाटोद्यातील गॅस एजन्सी चालक ''गॅसचा तुटवडा आहे'', ''वरतून पुरवठा बंद आहे'' अशी खोटी कारणे देऊन नागरिकांना तासनतास रांगेत उभे करत आहेत. अनेक नागरिक दिवसभर रांगेत उभे राहूनही त्यांना रिकाम्या हाती परत जावे लागत आहे. दुसरीकडे, याच एजन्सींमधून रात्रीच्या वेळी घरगुती सिलेंडर्सची गुपचूप वाहतूक करून ते हॉटेल आणि ढाब्यांना अव्वाच्या सव्वा किमतीत विकले जात आहेत.

तीन ट्रक सिलेंडर लपवल्याचा प्रकार उघड!

नुकताच पाटोदा परिसरात भरलेल्या सिलेंडर्सचे तब्बल ३ ट्रक एका गॅस एजन्सीने लपवून ठेवल्याचा प्रकार कॅमेऱ्यात कैद झाला आहे. एकीकडे नागरिक गॅससाठी वणवण फिरत असताना, दुसरीकडे असा मोठ्या प्रमाणावर साठा दडवून ठेवणे हा थेट काळाबाजार असल्याचे बोलले जात आहे. यामुळे संतप्त नागरिकांनी या एजन्सी चालकांवर कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे.

जिल्हाधिकाऱ्यांकडे जनतेची साकड

गॅस एजन्सी चालकांच्या या मनमानी

# मतदारसंघातील महत्त्वाच्या प्रश्नावर आ.क्षीरसागर आक्रमक

## लक्षवेधीद्वारे खरवंडी-राजूरी महामार्ग, सार्वजनिक बांधकाम विभागातील अनियमितता मांडली

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ खरवंडी ते नवगन राजुरी रस्त्यासंबधी आ.संदीप क्षीरसागर यांनी लक्षवेधी मुद्दा उपस्थित करीत या रस्त्याचे काम मागील अनेक वर्षापासून रखडले आहे. हा रस्ता पूर्ण होणार की, नाही ? रस्त्याचे झालेले काम निकृष्ट दर्जाचे असून याची आयआयटी मार्फत चौकशी करण्याची मागणी केली. तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २ चे प्रभारी कार्यकारी अभियंता कृष्णा पानसंबळ यांची चौकशी करण्याची मागणीही आ.क्षीरसागर यांनी लक्षवेधी सूचनेद्वारे केली.



राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ चे काम पूर्ण करण्याचा कालावधी हा १८ महिन्यांचा होता. मात्र ९ वर्ष झाले तरी हा रस्ता अपूर्ण असून, आजही २५ टक्के काम राहिलेले आहे. तसेच या रस्त्याचे काम करणाऱ्या कंत्राटदाराला ६० टक्क?यांपेक्षा जास्त रकम देण्यात आली आहे. काम रखडण्याचे कारण कोरोना आणि भूसंपादन असल्याचे सांगितले जात आहे. पण कोरोना काळ हा दोन वर्षांचा होता, तर १० टक्के भूसंपादन राहिले आहे. राष्ट्रीय महामार्गाची वर्क ऑर्डर निघण्याआधी पूर्ण होत असते तरीही यात हलगर्जीपणा झाला आहे. १० टके भूसंपादन ९ वर्षात पूर्ण करु न शकणारे अधिकारी, कर्मचारी याला कारणीभूत असल्याच सांगितले आहे. तसच अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी घेतल्या मात्र त्याचा मोबदला ही मिळाला नसल्याचे आ. क्षीरसागर यांनी म्हटले आहे. तसेच त्यांनी या लक्षवेधी सूचनेत सांगताना रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असून यापेक्षा पाणंद रस्ता बरा असे सांगत याची आयआयटी मार्फत चौकशी करण्यात यावी, यासोबतच हे काम कधीपर्यंत पूर्ण होणार आणि कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकण्याची मागणी केली. यावर मंत्र्यांनी उत्तर देताना भूसंपादन मावेजासाठी केंद्राकडे निधीची मागणी करण्यात आली असून, येत्या मे महिन्यात या रस्त्याचे काम पूर्ण तसेच दोषींवर कडक कारवाई करण्यात येईल, असे सांगितले. तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २ चे प्रभारी कार्यकारी अभियंता कृष्णा पानसंबळ यांच्याकडे पदवी नसतानाही कार्यकारी अभियंता पदाचा, अतिरिक्त पदभार देण्यात आला आहे. यामुळे यासंदर्भात सखोल चौकशी करण्याची मागणी आ. संदीप क्षीरसागर यांनी केली. याला उत्तर देताना सार्वजनिक बांधकाम विभागाचे मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी यासंदर्भात सविस्तर चौकशी करण्याचीही घोषणा केली.

# नगराध्यक्ष प्रेमलताताई पारवे यांनी टीमला सोबत घेऊन केली ठिकठिकाणी पाहणी

बीड । प्रतिनिधी

स्थायी समिती सदस्य आणि विषय समित्यांच्या निवडी, अर्थसंकल्पीय बैठक, सर्व साधारण सभा अशा प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर आता जनतेतून निवडून आलेल्या नगराध्यक्षा प्रेमलताताई पारवे जनतेसाठी पुर्ण टीम घेऊन रस्त्यावर उतरल्या आहेत. भर उन्हात आज त्यांनी पेठ बीड भागातील पाणी पुरवठ्याच्या फिल्टर प्लांटला भेट देऊन उपलब्ध पाणीसाठा आणि पाणी पुरवठ्याचे नियोजन याचा आढावा घेतला. फिल्टर प्लांटसह पाण्याच्या टाकीची पाहणी केली. त्यानंतर रमजान ईदच्या अनुषंगाने पेठ बीड व बालेपीर भागातील ईदगाह मैदानाची पाहणी केली.



मुस्लीम समाज बांधवांना नमाज अदा करण्यासाठी तातडीने मैदान साफ करण्याच्या सुचना दिल्या, त्याचबरोबर पुढील महिन्यातील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सावाच्या अनुषंगाने नगराध्यक्षांच्या टीमने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा परिसराची पाहणी केली. तेथील बंद असलेले कारंजे तात्काळ दुरूस्त करण्यासह तातडीने सुशोभिकरणाचे काम सुरू करा अशा सुचनाही नगर पालिकेच्या यंत्रणेला दिल्या.

बीडच्या नगराध्यक्षा प्रेमलताताई पारवे यांनी नगर पालिका पदाधिकाऱ्यांसह अधिकाऱ्यांची टीम सोबत घेऊन शहरातील विविध भागांना भर उन्हात भेटी दिल्या. यावेळी प्रतिनिधी शेख मुजीबभाई, उपनगराध्यक्ष विनोद मुळूक, स्वच्छता सभापती शेख निजाम, मुख्याधिकारी शैलेश फडसे, नगरसेवक रईस भाई, नबीलुज्जमा, संपादक मोहम्मद अबुबकर, सय्यद जुल्फेखारअली यांच्यासह पाणी पुरवठा,

◀◀ पान ३ वर

# कामगारानेच मारला सराफा दुकानातील दागिने व रोकडवर डल्ला

## वडवणीतील सुरज ज्वेलर्स दुकानात घडली घटना ✻ आरोपीविरुध्द पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी येथील मेन रोडवर असलेल्या विनय माणिकचंद नहार यांच्या सुरज ज्वेलर्स नामक सराफा दुकानातील कामाला असलेल्या अमोल सुभाष चव्हाण रा.कान्हापूर तांडा, या.वडवणी नामक कामगाराने चक्क आपल्याच मालकाच्या दुकानात हात साफ केला असून त्याने तब्बल ५ लाख २७ हजार २०० रुपयांची दागिने व रोख ५० हजार रुपये अशा एकूण ५ लाख ७७ हजार २०० रुपयांची चोरी केली असल्याची घटना दि.१४ जानेवारी २०२६ रोजी उघडकीस आली आहे. याप्रकरणी वडवणी पोलीस ठाण्यात काल गुरुवारी आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेने व्यापारी वर्गात एकच खळबळ उडाली असून जर दुकानातील कामगार नौकरच जर असे मालकाच्या विश्वासाला व स्वतःच्या प्रामाणिकपणाला कलंकित करत असतील तर मालक कोणाच्या भरवशावर दुकान चालवतील हा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहे.

वडवणी शहरातील नामांकित असलेल्या सुरज ज्वेलर्स सराफा दुकानचे मालक विनय माणिकचंद नहार यांनी गुन्हा दाखल करतांना दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, माझे वडवणी शहरात सुरज ज्वेलर्स नावाचे सराफा दुकान असुन ते मागील २० ते २५ वर्षापासून चालवतो. माझ्या सोन्याचे दुकानात सुनिल निपटे व अमोल सुभाष चव्हाण रा.कान्हापुर तांडा ता.वडवणी हे मागील दोन वर्षापासून कामास आहेत. माझ्या दुकानात सोन्या-चांदीचे दागिने विक्रीसाठी असतात व ग्राहकांच्या मागणी प्रमाणे तयार करुन देण्यात येतात. ग्राहकांना त्यांचे मागणी व आवडीप्रमाणे सोने-चांदीचे दागिने दाखविण्याचे काम दुकानातील नोकर करतात. दिनांक १३ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ७ ते ८ वाजेच्या दरम्यान एका ग्राहकाने दागिने खरेदी केले व त्यानंतर आम्ही दुकानातील सोने-चांदीच्या दागिणे साहित्याची आवराआवर केली व दिवसभरामध्ये सोने-चांदीचे दागिने विक्री होवून आलेली रोख रक्कम ३ लाख रुपये दुकान बंद करतांना नेहमीप्रमाणे दुकानातील स्ट्राँग रुम तिजोरीमध्ये सोनेचांदीच्या दागिन्यासह ठेवून दुकान बंद करण्यात आली व आम्ही सर्व घरी निघून गेलो. दिनांक १४ जानेवारी २०२६ रोजी सक्रांत सणाच्या दिवशी नेहमीप्रमाणे सकाळी ९ वाजेच्या दरम्यान दुकान

◀◀ पान ३ वर

# वनविभागातील कृत्रिम पाणवठे कोरडे

## वन्यप्राण्यांची पाण्यासाठी भटकंती ;वनविभागातील प्राण्यांचा जीव धोक्यात

बीड । प्रतिनिधी

सध्या उन्हाचा पारा वाढत असल्याने बाष्पीभवनाचा वेग मोठ्या प्रमाणात वाढला आहे. नैसर्गिक पाणीस्रोत असलेल्या तलाव, साठवण तलाव आणि धरणांतील पाण्याची पातळीही मोठ्या प्रमाणात घटली आहे. परिणामी बीड तालुक्यातील करचुंडी वनक्षेत्र अंतर्गत बेलगाव, पिंपरनई, फुकेवाडी, सोमनाथवाडी परिसरातील वनक्षेत्रातील कृत्रिम पाणवठे कोरडे पडले आहेत.



यामुळे हरीण, मोर, लांडोर, वानर आदी वन्यजीवांना पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई भासत असून ते पाण्याच्या शोधात मानवी वस्तीकडे तसेच गाव तलावांकडे धाव घेत असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे. वनविभागाने तयार केलेले अनेक कृत्रिम पाणवठे कोरडेठाक पडले असून त्यामध्ये नियमितपणे पाणी सोडले जात नाही. काही ठिकाणी महिनाभरापूर्वी

◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष


# माळेगाव कारखान्याच्या अध्यक्षपदी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची बिनविरोध निवड

**बारामती । प्रतिनिधी**

बारामती तालुक्यातील माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या अध्यक्षपदी राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांची बिनविरोध निवड करण्यात आली.गुरुवार (दि.१२) संचालक मंडळाच्या झालेल्या बैठकीत निवडणूक निर्णय अधिकारी वैभव नावडकर यांनी सदरची निवड जाहीर केली. यावेळी कारखान्याच्या उपाध्यक्षा संगीता कोकरे,ज्येष्ठ संचालक बाळासाहेब तावरे,सर्व संचालक,कार्यकारी संचालक अशोक पाटील आदींसह बहुसंख्येने सभासद शेतकरी उपस्थित होते.राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या अध्यक्ष पदी विद्यमान उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांची संचालक मंडळाच्या बैठकीत एकमताने निवड करण्यात आली.




माळेगाव साखर कारखाना हा राज्यात अग्रगण्य कारखाना म्हणून ओळखला जातो. राज्यात उच्चांकी ऊस दर देणारा कारखाना म्हणून या कारखान्याची ओळख आहे. राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कारखान्याच्या आठ महिन्यापूर्वी झालेल्या पंचवार्षिक निवडणुकीमध्ये एक हाती सत्ता मिळवून स्वतः चेअरमन पदाची जबाबदारी घेतली होती. मागील आठ महिन्याच्या कालावधीमध्ये अजितदादांनी स्वतः जातीने लक्ष घालून कारखान्याचा सर्वस्वी कायापालट करण्याचा निश्चय केला होता. तर राज्यातील पहिल्या पाच सहकारी साखर कारखान्यामध्ये माळेगाव कारखाना आणायचा हा दृष्टिकोन ठेवून काही महत्त्वपूर्ण निर्णय घेतले होते.यावेळी त्यांनी कारखान्याचा एक रुपयाही न घेता काही कोटी रुपयांचा निधी आणून कारखान्यातील अंतर्गत कामकाजास सुरुवात केली होती. तर येणाऱ्या काळात कारखाना कामगार वसाहत असेल कारखान्याला जोडणारे सर्व रस्ते असतील यासाठी त्यांनी उपाययोजना सुरू केल्या होत्या.

अशावेळी अजितदादांच्या अचानक निधनाने माळेगाव कारखान्याची फार मोठी हानी झाली आहे.तथापि अजितदादांच्या पत्नी राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हाती कारखान्याची धुरा सोपवण्यात आली आहे.दरम्यान अजितदादांच्या पावलावर पाऊल ठेवून सुनेत्रा पवार या देखील माळेगाव साखर कारखान्याला राज्यातील पहिल्या पाच कारखान्यात नेऊन ठेवतील असा विश्वास सभासद शेतकरी व्यक्त करत आहेत.

कारखान्याच्या पहिल्या महिला अध्यक्ष

बारामती तालुक्यातील माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या ७० वर्षाच्या इतिहासात पहिल्या महिला अध्यक्ष म्हणून सुनेत्रा अजित पवार यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. तर सध्या कारखान्याच्या उपाध्यक्ष पदी संगीता कोकरे या कार्यरत आहेत एकूणच माळेगाव कारखान्याच्या इतिहासात पहिल्यांदाच अध्यक्ष व उपाध्यक्ष दोन्ही पदे महिलांकडे असतील.

उपमुख्यमंत्री व कारखान्याच्या अध्यक्ष सुनेत्रा पवार यांनी यापूर्वी विविध सामाजिक आणि शैक्षणिक संस्थांवर यशस्वीपणे काम केले असून, 'निर्मल वारी' आणि 'पर्यावरण रक्षण' यांसारख्या उपक्रमांमुळे त्यांची स्वतंत्र ओळख निर्माण झाली आहे.मात्र, उपचारांपूर्वीच त्याचा मृत्यू झाला होता. पोलिसांनी अकस्मात मृत्यू अशी नोंद केली आहे. पार्थने आत्महत्या का केली? याबाबत माहिती मिळू शकली नाही. त्याच्या कुटुंबीयांकडे चौकशी सुरू असून, पोलिसांनी देशी बनावटीचे पिस्तूल जप्त केले आहे. हे पिस्तूल त्याने कोणाकडून आणले, यादृष्टीने तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

## भीमाशंकर परिसरातील स्थलांतराच्या चर्चेमुळे आदिवासींमध्ये नाराजी

**मंचर । प्रतिनिधी**



भीमाशंकर मंदिर परिसरातील नागरिकांचे स्थलांतर करण्याचा शासनस्तरावर विचार सुरू असल्याने स्थानिक आदिवासींमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. कुंभमेळा व पर्यावरण संरक्षणाच्या कारणावरून परिसरातील नागरिकांना इतरत्र हलवण्याचा प्रयत्न होत असून, त्यामुळे त्यांच्या भवितव्यावर परिणाम होईल, अशी भीती स्थानिकांनी व्यक्त केली आहे.

मंदिर परिसरात गाडीवाले, गाईड, डोलीवाले, बेलफूल विक्रेते, गंध लावणारे, तसेच छोटे दुकानदार आणि कचरा गोळा करणारे असे शेकडो आदिवासी तरुण-महिला विविध व्यवसायांद्वारे उपजीविका करतात. प्रस्तावित स्थलांतरामुळे त्यांच्या रोजगारावर गदा येण्याची शक्यता आहे. भीमाशंकर विकास आराखडा तयार करताना आदिवासी समाजाला केंद्रस्थानी ठेवणे आवश्यक आहे. मात्र, सध्याच्या आराखड्यात त्यांचे अस्तित्व दिसत नसल्याची टीका होत आहे.

गावठाणातील घरांची नोंद ग्रामपंचायतीकडे असल्याने त्या नागरिकांना पर्यायी घरे मिळण्याची शक्यता आहे. मात्र, मंदिर परिसरातील बेलफूल विक्रेते, टपरीवाले, गाईड, डोलीवाले, गाडीवाले आणि गंध लावणारे अशा अनेक दुकानदारांच्या नोंदी अद्याप अधिकृतपणे झालेल्या नसल्याने त्यांना भविष्यात नुकसान होण्याची भीती व्यक्त होत आहे. त्यामुळे त्यांच्या उपजीविकेचे काय होणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे. नव्याने उभ्या राहणाऱ्या व्यवस्थेत बाहेरील आर्थिकदृष्ट्या सक्षम लोकांचे वर्चस्व वाढण्याची शक्यता आहे. ही मंडळी आदिवासींच्या अज्ञानाचा गैरफायदा घेऊ शकतात. त्यामुळे विकास आराखडा तयार करताना स्थानिकांना विश्वासात घेऊन त्यांच्या हक्कांचे संरक्षण करणे आवश्यक असल्याची मागणी होत आहे.

## महापालिकेसमोर फोडले माठ! हडपसरच्या पाणीप्रश्नावरून शिवसैनिक आक्रमक

**पुणे । प्रतिनिधी**



उन्हाळ्याची चाहूल लागताच शहरात पुन्हा पाणीटंचाईचे सावट गडद झाले असून, हडपसर परिसरातील पिण्याच्या पाण्याच्या गंभीर प्रश्नावरून शिवसेनेने बुधवारी महापालिकेवर भव्य हंडा मोर्चा काढत प्रशासनाला धारेवर धरले. शहरप्रमुख प्रमोद नाना भानगिरे यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आलेल्या या आंदोलनात मोठ्या संख्येने महिला, नागरिक आणि शिवसैनिक सहभागी झाले होते. महिलांनी महापालिकेच्या प्रवेशद्वारासमोर माठ फोडून प्रशासनाच्या निष्क्रियतेचा तीव्र निषेध नोंदवला. या वेळी घोषणांनी परिसर दणाणून गेला.हडपसर मतदारसंघातील प्रभाग क्रमांक ४१, तसेच परिसरात पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. महापालिकेने विविध ठिकाणी पाण्याच्या टाक्या उभारल्या असल्या, तरी त्या टाक्यांमध्ये नियमित आणि पुरेशा प्रमाणात पाणीपुरवठा होत नसल्याने अनेक टाक्या रिकाम्याच आहेत.

याबाबत शिवसेनेच्या वतीने प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करण्यात आला. मात्र, परिस्थितीत कोणताही बदल न झाल्याने संतप्त झालेल्या शिवसैनिकांनी महापालिकेच्या मुख्य प्रवेशद्वारावर हंडा मोर्चा काढून जोरदार आंदोलन केले. टाक्या उभारल्या चौकात, पाणी नाही नळात, अशा घोषणा देण्यात आल्या. आंदोलनादरम्यान पाणीटंचाईची तीव्रता दाखवून देण्यासाठी महापालिकेच्या प्रवेशद्वारासमोर टँकर उभा करून प्रतीकात्मक निदर्शने करण्यात आली. या वेळी महिलांनी माठ फोडून प्रशासनाच्या दुर्लक्षाचा निषेध नोंदवला. आंदोलनात स्वाती टकले, राकेश झांबरे, मच्छिंद्र दगडे, अमर घुले, सुभाष घुले, मिलिंद अहिरे, अभिमन्यू भानगिरे, सचिन तरवडे, प्रवीण हिलगे, पंकज कोंद्रे, अभिजीत बोराटे यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ऐतिहासिक शनिवारवाडा परिसरात आगीची घटना



**पुणे । प्रतिनिधी**

पुणे शहरातील ऐतिहासिक वास्तू असलेल्या शनिवारवाडा परिसरात आज दुपारी अचानक भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारवाड्याच्या मुख्य गेटजवळ साठलेला कचरा आणि वाळलेल्या लाकडांनी पेट घेतल्याने आग लागल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. सुदैवाने, या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसल्याची माहिती समोर आली आहे. दुपारी साडेबाराच्या सुमारास आग लागल्याची माहिती मिळत आहे. कचरा आणि वाळलेल्या लाकडांनी अचानक पेट घेतल्याने आगीचे धुराचे लोट ४० ते ५० मीटर पर्यंत पसरले. आग लागल्याची माहिती मिळताच मोठी धावपळ झाली. अग्निशमल दलाचे दोन बंब घटनास्थळी दाखल झाले. जवान आग विझवण्याचा प्रयत्न करत आहेत. आगीचं नेमकं कारण अद्याप समोर आलेले नाही. मात्र, सध्या पुण्यात तापमान वाढलेले असून कडाक्याचे ऊन पडत आहे. वाढलेल्या उष्णतेमुळे वाळलेला कचरा आणि लाकडांनी पेट घेतला असावा, असा प्राथमिक अंदाज आहे.

## काशेवाडीत ड्रग्ज व वेश्याव्यवसायाचा उच्छाद; नगरसेविका अर्चना पाटील आक्रमक

**पुणे । प्रतिनिधी**

काशेवाडी परिसरात वाढत्या गुन्हेगारीसह ड्रग्जचा व्यापार आणि वेश्याव्यवसाय राजरोसपणे सुरू असल्याचा गंभीर मुद्दा भारतीय जनता पक्षाच्या नगरसेविका अर्चना तुषार पाटील यांनी पुणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या परिमंडळ १ च्या वार्षिक तपासणी बैठकीत उपस्थित केला. पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या उपस्थितीत त्यांनी काशेवाडी (प्रभाग क्र. २२) परिसरातील अवैध धंदे आणि पोलिसांच्या कार्यप्रणालीवर थेट प्रश्न उपस्थित करत तीव्र नाराजी व्यक्त केली.

बैठकीत बोलताना पाटील यांनी सांगितले की, काशेवाडी परिसरात पानपट्ट्या आणि टपऱ्यांवरून उघडपणे ‘एमडी’ सारख्या अमली पदार्थांची विक्री सुरू आहे. या व्यसनाच्या आहारी अल्पवयीन मुले जात असून ड्रग्ज खरेदीसाठी चोऱ्यांसारख्या गुन्ह्यांकडे त्यांचा कल वाढत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. तसेच वस्तीमध्ये रात्रीच्या वेळी जुन्या व बेवारस वाहनांच्या आडोशाने तसेच परिसरातील लाईट्स फोडून वेश्याव्यवसायाचे रॅकेट सुरू असल्याचा आरोपही त्यांनी केला. या प्रकारामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असल्याचे त्यांनी सांगितले.



काशेवाडी पोलीस चौकीत नागरिकांच्या, विशेषतः महिलांच्या तक्रारींची दखल घेतली जात नसल्याचा आरोपही त्यांनी केला. तक्रार करण्यासाठी आलेल्या नागरिकांना चौकीतून परत पाठवून थेट खडक पोलीस ठाण्यात जाण्यास सांगितले जात असल्याचेही त्यांनी सांगितले. अवैध धंद्यांची ठिकाणे वारंवार लेखी स्वरूपात दिली असूनही ठोस कारवाई होत नसल्याची खंत व्यक्त केली. या प्रकरणाची गंभीर दखल घेत पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना खडसावत, अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी तातडीने कारवाई करण्याच्या सूचना दिल्या असल्याचे नगरसेविका पाटील यांनी सांगितले.

## बनावट सोन्याची बिस्कीटे देत फसवणूक! दोघांना अटक; लाखांचा मुद्देमाल जप्त

**पुणे । प्रतिनिधी**

बनावट सोन्याची बिस्कीटे देऊन अस्सल सोन्याची मोड घेत फसवणूक करणाऱ्या दोघांना अटक केली आहे. दिलीप विश्र्वनाथ स्वामी उर्फ जाधव (वय ५२,रा. जळकोट,जि.लातुर), अमोल बाबू गिरी (वय ३२ रा. अहमदपूर, जि. लातुर) अशी त्यांची नावे असून त्यांच्याकडून १२ लाख ७५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.



यातील दिलीप स्वामी रेकॉर्डवरील गुन्हेगार असून,त्याच्यावर विविध ठाण्यात अपहरण, फसवणूक असे गुन्हे दाखल आहेत. खंडणी विरोधी पथकाचे हवालदार नितीन मुंढे, कानिफनाथ कारखिले हडपसर ठाण्याच्या हद्दीत गस्तीवर असताना स्वामी साथीदारासह साधना विद्यालयाकडे जाणाऱ्या कॅनल रोडवर चोरी करण्याच्या तयारीत असल्याची माहिती मिळाली. त्याला पकडल्यावर २४ जुलै २०२५ ला प्रेमळ विठ्ठल मंदीराजवळ वयस्कर महिलेला बनावट सोने देत अस्सल सोन्याची पोत लांबविली होती. झडतीत आरोपींच्या खिशात सोन्यासारखी दिसणारी पिवळ्या धातूनची दोन बिस्कीटे, एक बेन्टेक्सची साखळी मिळाली.

आरोपींनी आणखी एका जेष्ठ महिलेला बनावट सोन्याची बिस्कीटे देऊन गळ्यातील मंगळसूत्र काढून घेतले होते. ही घटना कराडमध्ये घडली होती. ही कामगिरी पोलिस उपनिरीक्षक गौरव देव, पोलिस हवालदार नितीन मुंढे, कानिफनाथ कारखीले, चेतन आपटे, विनोद महाजन, गणेश खरात यांच्या पथकाने केली.

## शिवाजीनगर रेल्वे स्थानक परिसरात सापळा; गावठी पिस्टलसह सराईत गुन्हेगाराला अटक

**पुणे । प्रतिनिधी**

शिवाजीनगर रेल्वे स्थानक परिसरात गावठी पिस्टल घेऊन येणाऱ्या एका सराईत गुन्हेगाराला शिवाजीनगर पोलिसांनी सापळा रचून अटक केली. आरोपीकडून एक गावठी पिस्टल व दोन जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली असून त्याच्याकडे हे शस्त्र कुठून आले याचा पुढील तपास सुरू आहे. पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, ११ मार्च २०२६ रोजी शिवाजीनगर पोलीस ठाणेकडील गुन्हे तपास पथकाचे सपोनि संतोष पाटील, पोहवा १७२८ दिपक चव्हाण व पोना. २२९७ सचिन जाधव यांना त्यांच्या गुप्त बातमीदाराकडून खबर मिळाली की, शिवाजीनगर रेल्वे स्टेशन जवळील परिसरात




एक सराईत गुन्हेगार हा त्याचे ताब्यात गावठी पिस्तुल घेवुन येणार आहे.

या माहितीच्या आधारे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गिरीशकुमार दिघावकर यांच्या आदेशाने व मार्गदर्शनाखाली पोलिसांनी दोन पथके तयार करून परिसरात सापळा रचला. त्यानंतर संशयित हालचाली करणाऱ्या सिद्धार्थ अनिल चोराडे ( २०, रा. ज्ञानेश्वर नगर, तळेगाव दाभाडे) याला ताब्यात घेऊन त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे एक गावठी पिस्टल व दोन जिवंत राऊंड आढळून आले. याप्रकरणी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली आहे. तपासादरम्यान आरोपीकडे हे बेकायदेशीर शस्त्र कोठून प्राप्त झाले याबाबत पोलीस अधिक तपास करीत आहेत. पोलीस नोंदी तपासल्यानंतर आरोपी हा सराईत गुन्हेगार असल्याचे निष्पन्न झाले असून त्याच्यावर यापूर्वी शिवाजीनगर व तळेगाव दाभाडे पोलीस ठाण्यात बेकायदेशीर शस्त्र बाळगल्याचे गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली. ही कारवाई सहपोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा, अपर पोलीस आयुक्त राजेश बनसोडे, पोलीस उपायुक्त हृषीकेश रावले, सहायक पोलीस आयुक्त चंद्रकांत भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक गिरीशकुमार दिघावकर यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष पाटील, दीपक चव्हाण, सचिन जाधव, प्रमोद मोहिते, महावीर बलटे, राजकिरण पवार, तायडे व श्रीकृष्ण सांगवे यांनी केली.

## फुलगावात माजी आमदार दीपक पायगुडेंचे आंदोलन; रस्ता नूतनीकरणाला तीव्र विरोध



**पुणे । प्रतिनिधी**

फुलगाव तालुका हवेली येथील सैनिकी शाळेच्या मैदानातून जाणारे रस्त्याचे काम थांबवण्याबाबत कळवून देखील काम सुरू केल्याच्या निषेधार्थ माजी आमदार दीपक पायगुडे यांनी आंदोलन केले आहे. या आंदोलनाची हवेली तालुक्यात मोठ्या प्रमाणात चर्चा होऊ लागली आहे. ग्रामविकास अधिकारी फुलगाव तालुका हवेली यांना सैनिकी शाळेच्या मैदानालगत जाणाऱ्या रस्त्याचे नूतनीकरण त्वरित बंद करण्याबाबत लोकसेवा प्रतिष्ठान संचलित नेताजी सुभाष चंद्र बोस सैनिकी शाळा फुलगाव संस्थेच्या वतीने पत्रव्यवहार करण्यात आला होता. सैनिकी शाळेच्या हद्दीतून रस्ता जात असल्याने तातडीने रस्त्याचे काम बंद करावे अशी विनंती प्राचार्य नेताजी सुभाष चंद्र बोस मिलिटरी स्कूल फुलगाव यांच्या वतीने करण्यात आली होती. याशिवाय काम थांबवण्याबाबत जिल्हाधिकारी पुणे यांना देखील संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दीपक पायगुडे यांनी देखील पत्रव्यवहार केला होता. तरी देखील काम सुरू झाल्याने माजी आमदार दीपक पायगुडे यांनी प्रशासनाच्या विरोधात त्या रस्त्यावर बसून आंदोलन करण्यास सुरुवात केली असून या आंदोलनास अनेक मान्यवर पाठिंबा देत आहे. माजी आमदार पायगुडे यांनी मध्यरात्री पासून आंदोलन सुरू केल्याने सर्वत्र चर्चा होऊ लागली आहे.

## पुण्यातील विद्यार्थी मेस आणि हॉटेल्सवर गॅस तुटवडा; जेवणासाठी गंभीर समस्या

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यात शिक्षणासाठी तसेच स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करण्यासाठी हजारो विद्यार्थी वास्तव्याला आहेत. त्यांच्या नाष्टा, जेवण, चहाचा प्रश्न सोडविणाऱ्या हॉटेल व्यावसायिक आणि मेसचालकांसमोर गॅसटंचाईची अभूतपूर्व समस्या निर्माण झाली असून, त्यांच्याकडे एक ते दोन दिवसांचे व्यावसायिक सिलिंडर उपलब्ध आहेत, तर सिलिंडर मिळण्यासाठी आता किमान १५ दिवसांचा कालावधी जाणार आहे. त्यामुळे हॉटेल व्यावसायिक, मेसचालक गॅसवर आहेत, तर विद्यार्थी आणि स्पर्धा परीक्षार्थींसमोर पोटाची खळगी भरण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

इराण, इस्रायल आणि अमेरिका यांच्यातील संघर्षाचा परिणाम व्यावसायिक सिलिंडर वापरणाऱ्यांना बसला आहे. व्यावसायिक सिलिंडर पुरवठादारांनी पुढील पंधरा ते वीस दिवस सिलिंडर मिळणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे आहे त्या गॅसवर एक ते दोन दिवसच हॉटेल




किंवा मेस चालणार आहे. हॉटेल व्यावसायिक तसेच मेसचालकांकडून तात्पुरता पर्याय म्हणून इलेक्ट्रीक शेगड्यांचा वापर करून स्वयंपाक सुरू ठेवण्याचा प्रयत्न केला जात आहे. गॅसचा पुरवठा लवकर सुरळीत झाला नाही, तर हॉटेल आणि मेस बंद ठेवण्याची वेळ येणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आणि स्पर्धा परीक्षार्थींमध्ये चिंता वाढली आहे. काही विद्यार्थ्यांनी तर जेवणाची व्यवस्था बंद झाल्यास गावी परतण्याचा विचार करावा लागणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

## २१ वर्षीय तरुणाने स्वत:वर झाडली गोळी

**पुणे । प्रतिनिधी**

नांदेड सिटीत एका तरुणाने पिस्तुलातून गोळी झाडून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली. पार्थ बापू गोरे (वय २१, रा. आसावरी इमारत, नांदेड सिटी) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. याबाबत पोलीस उपनिरीक्षक गणेश कसबे यांनी नांदेड सिटी पोलिसांत फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पार्थ नांदेड सिटीत मामांकडे राहात होता. नांदेड सिटीतील आसावरी इमारतीतील एका सदनिकेत तरुणाने गोळी झाडून आत्महत्या केल्याची माहिती मंगळवारी (१० मार्च) पोलिसांना मिळाली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पार्थने कानाच्या मागे पिस्तूल लावून गोळी झाडून आत्महत्या केल्याचे उघडकीस आले. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून त्याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले.

## डंपरनं सायकलस्वार विद्यार्थ्याला चिरडलं, जागीच मृत्यू

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहरातील प्रेम लोक पार्क परिसरात आकुर्डीवरून चिंचवडगावकडे जाणाऱ्या रस्त्यावरती एका १४ वर्षाच्या शाळकरी मुलाला आरएमसी ट्रक अर्थात डंपरने(-ललळवशपीं छ्शुी) चिरडलं. या घटनेत शाळकरी मुलाचा मृत्यू झाला असल्याची माहिती समोर आली आहे. आज दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास हा अपघात घडला असून या अपघातात फारुक शकील तांबोळी या नववीत शिकणाऱ्या शाळकरी मुलाचा दुर्दैवी मृत्यू (-ललळवशपीं छ्शुी) झाला आहे, या अपघाताचा सीसीटीव्ही व्हिडीओ देखील समोर आला असून, घटनेचं गांभीर्य ओळखून पिंपरी चिंचवड पोलिसांनी ट्रक चालक आणि ट्रकला देखील ताब्यात घेतले आहे.

अपघाताबाबत माहिती देताना पोलिस निरीक्षक दत्ता चासकर यांनी सांगितले की, प्रेम लोक पार्क जवळून खंडोबा माळी परिसरात चापेकर चौकाकडे एक आरएमसी ट्रक अर्थात डंपर चालला होता, त्यावेळी सायकलवरून जाणाऱ्या चौदा ते पंधरा वर्षांचा मुलगा फारुक शकील तांबोळी असं त्याचं नाव आहे. तो सायकलवरती चालला होता. पाठीमागून आरएमसी ट्रकने धडक दिली. मुलाला वायसीएम हॉस्पीटलमध्ये दाखल केलेलं आहे. आरएमसी चालकाला ताब्यात घेतलं आहे. त्याचा ट्रक देखील ताब्यात घेतलं आहे. त्याच्यावरती कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. चालकाला पोलिस स्टेशनला नेण्यात आलं आहे, त्याचा तपास सुरू आहे. साडेबाराच्या आसपास ही घटना घडली आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे. मुलाचे नाव फारुक शकील तांबोळी असं आहे. तो इयत्ता नववीमध्ये आहे. ट्रक चालकाला ताब्यात घेतलं आहे. योग्य कारवाई सुरू आहे. अशा डंपरला शहरात येण्यासाठी काही काळ ठरवून दिलेला आहे. आपल्याकडे १२ वाजल्यानंतर प्रतिबंध घालण्यात आलेला आहे. हा अपघात साडेबारा वाजण्याच्या आसपास घडला आहे, त्यामुळे ते प्रतिबंध वेळेत घडले आहे. आम्ही सीसीटीव्ही फुटेज चेक करत आहोत.